**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १**
**सन-२००९-२०१०**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- १०/७/२००९

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **विशेष सभा क्र. १ मंगळवार दिनांक १४/७/२००९ दुपारी १.००** वाजता महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड, येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक :- १
सन-२००९-२०१०
**मंगळवार दिनांक.- १४/७/२००९ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्रं.** | **विषय** |
|---|---|
| १ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त यांनी तयार केलेले महानगरपालिकेचे सन २००९-२०१० चे मूळ अंदाज पत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) सादर करणे. |
| २ | अहमदनगर महानगरपालिका जकात हद्यीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसूलीसाठी एक वर्षाच्या कालावधी करीता जकात अभिकर्ता नेमणेकामी मागविण्यात आलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट यावर विचार विनिमय करून निर्णय घेणे. |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- १ मंगळवार दि.१४/७/२००९

ठराव क्रमांक -१ मंगळवार दि.१४/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५अन्वये मा.आयुक्त यांनी तयार केलेले महानगरपालिकेचे सन २००९-२०१० चे मूळ अंदाज पत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) सादर करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- विषय :- सन २००९-२०१० चा अर्थसंकल्प

विनंती टिप्पणी देण्यात येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २००९-२०१० चा अर्थसंकल्प मा. आयुक्त यांनी तयार केला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार अर्थसंकल्प मा. स्थायी समितीस सादर करणे बाबत. मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. तरी सन २००९-१० चा अर्थसंकल्प मा. स्थायी समिती बैठकीत घेण्यात यावा. सोबत मा. आयुक्त यांची मंजूर टिप्पणी, सन २००९-२०१० चा अर्थसंकल्प व कर, दर, फी वाढ / घट बाबतचे प्रस्ताव जोडले आहेत.येणे प्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**<u>चर्चा :-</u>**

मा.श्री.संजय गाडे सभापती :- अहमदनगर शहराच्या सर्वांगिण विकासाकरीता आवश्यक असणारे महानगरपालिकेचा अर्थसंकल्पा करीता आजची मिटींग आयोजित करण्यात आलेली आहे. सर्वात प्रथम मी मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी, पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे समितीच्या वतीने हार्दिक स्वागत करतो. शहराच्या सर्वांगिण विकासा करीता सर्वांनी सहकार्य करावे ही विनंती.

मा.कल्याण केळकर आयुक्त :- सभापती स्थायी समिती , उपस्थित सर्व स्थायी समिती सदस्य यांचे स्वागत करतो. मी आज सन २००९-२०१० चा अर्थसंकल्प मा.सभापती स्थायी समिती यांच्याकडे सादर करीत आहे.

यानंतर मा.आयुक्त सो, यांनी अर्थ संकल्पावर आपले मनोगत व्यक्त केले.

मा.आयुक्त सो :- मी मा.सभापती साहेबांच्या विनंतीने एक विषय सभागृहासमोर मांडतो. सध्या संपुर्ण देशभर होणारा मान्सुनचा पाऊस हा अत्यंत कमी प्रमाणात सर्वत्र पडत आहे. भारतातील सर्वाधिक पाऊस पडणारे ठिकाण चेरापुंजी येथे सुध्दा सध्या पाण्याबाबत दुष्काळी टंचाई जाणवु लागलेली आहे. देशातील सर्व धरणातील पाण्याची पातळी कमी झालेली आहे. नाशिक विभागातील धरणात ८ टक्के पाणी शिल्लक आहे. ही चिंताजनक बाब आहे. हा अर्थसंकल्प तयार करतांना पिण्याच्या पाण्याबाबत विचार करणे आवश्यक झालेले आहे. अहमदनगर शहरातील पाण्याचे सद्यस्थितीतील जाणवणारे दुर्भिक्ष लक्षात घेवून शहरासाठी नविन पाईप लाईन (मुळानगर ते वसंतटेकडी दरम्यान) टाकणे बाबत मा.स्थायी समिती सदस्यांनी जाणिवपुर्वक विचार करावा.

मा.श्रीमती.ढोणे मालन सुरेश :- आजच्या अर्थसंकल्पा विषयक आयोजित केलेल्या बैठकीची आम्हास टिपणी मिळालेली नाही.

मा.श्री.जावळे पंकज, उपायुक्त :- मा. आयुक्त सो, यांनी आज जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे. तोच आजच्या कमिटीची टिपणी आहे.

मा.सभापती :- आज मा.आयुक्त सो, यांनी आपणांस सादर केलेल्या अर्थसंकल्पावर उद्या दिनांक १५/०७/२००९ रोजी दुपारी ३-०० वाजता चर्चाविनिमय करण्यात येईल. आजच्या सभेचा पुढील विषय घेण्यात यावा.

**दिनांक १५/०७/२००९ रोजी दुपारी ३-०० वाजता मा.स्थायी समिती सभागृह येथे बजेट बाबतच्या विशेष सभेस पुन्हा सुरुवात झाली.**

**अतिक्रमण विभाग :-**

मा.श्री.बाळासाहेब पवार :- सार्वजनिक रस्त्यामध्ये वाहतुकीस अडथळा न येता कमान उभारणे कामी मागील व नविन दर किती ठेवण्यात आलेले आहेत. वाढविण्यात आलेले आहेत काय ? सन २००९-२०१० च्या अंदाजपत्रकामध्ये प्रतिदिन एका कमानीसाठी ५० होर्डीगसाठी १० चौ.मी.पर्यंत रु.५० प्रतिदिन व तात्पुरत्या स्टॉल करीता २५ चौ.फुटाकरीता रु.५०/- दर ठेवण्यात आलेले आहेत.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- कमान उभारणी साठी प्रतिदिन ५०/- रु. दर ठेवा.

मा.श्री.लोंढे :- कमानी पोटी या आगोदर वसुल कीती झाला. पैसे वसुल केले आहेत काय ?

श्री.कर्डिले :- २८,६००/- रुपये वसुल केले आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- गणपती उत्सव काळात सार्वजनिक मंडळाकडुन लावण्यात येणा-या होर्डिंग्ज व मंडळाच्या इतर बोर्डावर कमीत कमी आकारणी करण्यात यावी. त्यांना सवलत देण्यात यावी.

श्री.धोंगडे :- उत्सवाचे कालावधीमध्ये रक्षाबंधन, नवरात्र, दिपावली या सणाचे कालावधी मध्ये तात्पुरते स्वरुपात स्टॉल उभारुन विक्री करणा-या दुकानदारांची विक्री ही मोठ्या प्रमाणावर होते परिणामी त्यांच्या पाठीमागे असलेल्या गाळयांमधील विक्रेत्यांची वर्षभर कर भरुनही त्यांना पाहिजे त्या प्रमाणात विक्री होत नाही. परिणामी त्यांच्या धंद्यांवर परिणाम होतो. रस्त्याच्या बाजुला तात्पुरते स्टॉल उभारुन विक्री करण्यास परवानगी द्यायलाच नाही पाहिजे. त्यामुळे रस्त्यांवर वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- पाईप लाईन रस्त्याच्या कडेने आजमितीस ५० ते ६० भाजीवाले बसतात. रस्ता आडवतात वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. परिणामी अपघातांची संख्या वाढते.

मा.श्रीमती.मालन ढोणे :- अशा रस्त्याच्या कडेला भाजीपाला व इतर पदार्थ / साहित्य विक्री करणारांना रु.३००/- दंड ठेवण्यात यावा.

मा.सभापती :- तात्पुरत्या स्वरुपात स्टॉल उभारुन विक्री करणा-यां करीता २५ चौ.फुट जागेकरीता दर रु.५०/- ऐवजी १००/- करण्यांत यावे. सदर स्टॉलसाठी परवानगी न घेणा-या कडुन दंड आकरण्यात यावा.

**सभागृह भाडे बाबत :-**

मा.उपायुक्त (सा) :- अहमदनगर महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीमधील सभागृह हे सांस्कृतिक धार्मिक तसेच इतरही कार्यक्रमासाठी आपण वापरास उपलब्ध करुन देत आहे. जवळपास ९० टक्के लोकांची मागणी सदर सभागृह विनामुल्य मिळावे अशी असते. सदरचे सभागृह हे खरोखरच ज्या संस्थेची आर्थिक परिस्थिती खालावलेली असते. जे सभागृहाचे भाडे भरु शकणार नाहीत अशाच गरजवंत संस्थांना विनामूल्य सभागृह उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. त्याठिकाणी आपण टेबल खुर्च्या माईक स्पीकरची व्यवस्था आहे. गाडी पार्किंग जागा आपण उपलब्ध करुन देत आहोत. एवढया सर्व सुविधा देत असतांना विनामूल्य सभागृह उपलब्ध करुन देणे योग्य नाही. शहरातील महानगरपालिकेच्या मालकीच्या मंगलकार्यालया बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. इतर मंगलकार्यालया पेक्षा कमी प्रमाणात भाडे आकारणी होत असतांनाही मंगलकार्यालय विनामूल्यच मिळावे अशी अनेक नागरिकांची धारणा असते. सभागृह विनामूल्य देणे बाबतचे जे अधिकार देण्यात आलेले आहेत. ते काढुन घ्यावेत. म्हणजे आम्ही विनामूल्य सभागृह देणार नाहीत.

मा.सभापती :- महानगरपालिका हद्दीतील मंगलकार्यालये, मनपा सभागृह विनामूल्य वापरास देण्या बाबतचे अधिकार मा.महापौर / उपमहापौर यांना दिले तर काय हरकत आहे.

मा.उपायुक्त (सा) :- मा.आयुक्त, उपायुक्त हे शासन नियुक्त प्रशासनाचे अधिकारी असतात. लोकप्रतिनिधींकडे विनामूल्यचे अधिकार दिल्यास महानगरपालिकेस भाड्यापोटी काहीही मिळणार नाही. सर्वच मंगलकार्यालये व सभागृह कायमस्वरुपी विनामूल्यच वापरले जातील.

मा.श्री.लोंढे :- लग्नसमारंभामध्ये १०x१० मंडप / शामियाना टाकावयाचा ठरला तर अंदाजे ४०० ते ५०० रु.खर्च येतो लाईट बिल वेगळे. आपण एवढया कमी दरामध्ये नगरपालिका हॉल उपलब्ध करुन देतो ज्या संस्थेची आर्थिक परिस्थिती ठीक नसेल त्यांचेकडुन नाममात्र रक्कम घेवुन सभागृह उपलब्ध करुन द्यावे.

मा.उपायुक्त (सा) :- शासकीय कामकाजासाठी सभागृहाची आवश्यकता लागल्यास कमीत कमी २५०/- रुपये घेवुन आपण उपलब्ध करुन देतो.

मा.श्री.गणेश भोसले :- महानगरपालिका सभागृहाचे भाडे रक्कम रु.११००/- करण्यात यावे.

**आरोग्य / घनकचरा व्यवस्थापन :-**

मा.श्री.बाळासाहेब पवार :- शहरामध्ये घर ते घर जावुन कचरा गोळा करण्या करीता चालू केलेल्या कचरा गाड्या आमच्या भागात आठ आठ दिवस येत नाहीत. कचरा वेळेवर उचलला जात नाही. कचरा टाकणेसाठी कंटेनर नसल्यामुळे जमा झालेला कचरा वा-यामुळे उडुन इतरत्र पसरतो सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने वेळेवर कचरा उचलला न गेल्याने दुर्गंधी सुटून आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे.

श्री.मेहेत्रे :- अहमदनगर महानगरपालिकेत प्रत्येक घरोघरी जावुन कचरा गोळा करण्याकरीता ३० गाड्या चालू आहेत. शहरातील जवळ-जवळ ७० टक्के भागातील कचरा उचलण्याचे काम होत आहे.

मा.सभापती. :- कचरा उचलण्यासाठी गाड्या कीती ? गाड्यांचे वाटप कशा पध्दतीने केले जाते.

श्री.मेहेत्रे :- महानगरपालिकेत आत्ता सध्या ३२ गाड्या चालू आहेत. ज्या भागात जास्त प्रमाणात कचरा साठला जातो तेथे जादा गाड्यांच्या खेपा केल्या जातात. प्रत्येक गाडीला ठराविक एरिया ठरवुन देवुन त्या भागातील कचरा ठराविक वेळेतच उचलला जाईल अशी व्यवस्था करुन टाईम टेबल ठरवुन दिलेले आहे. त्यानुसार कचरा उचलण्याचे काम चालू आहे.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- घरगुती कचरा गोळा करण्याचे दरमहा ५० रुपये प्रमाणे वर्षासाठी ६००/- रुपये होतात एखाद्याची घरपट्टीही एवढी होत नाही. त्यापेक्षा त्याला कच-यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागतात. कचरा उचलण्यासाठी दरमहा ५० प्रमाणे वार्षिक ६००/- घरपट्टी पाणीपट्टी व इतर सर्व कर मिळुन त्याची वार्षिक वसुली मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. सर्व सामान्य नागरीक येणारे जादा बिल भरण्यास तयार होणार नाहीत. परिणामी वसुली थकबाकी वाढण्याची शक्यता आहे.

मा.उपायुक्त (सा) :- दरमहा ५०/- रु. जादा होत असतील तर सभासदांनी दर ठरवावेत. ७० टक्के प्रत्येक घरोघर जावुन कचरा गोळा केला जात आहेत. उपक्रम चांगला आहे. १ ते २ वर्षात सगळयांच्या घरी गाडी येईल. आर्थिक परिस्थिती सुधारल्या नंतर आणखी काही गाड्या घेवू. व्यावसायिकांना जादा दर लावा.

मा.सभापती :- घरगुतीसाठी २० रुपये व्यावसायिकांसाठी १००/- औद्योगिक साठी २००/- हॉटेल्स पोल्ट्रीज नर्सिंगहोम २५०/- प्रमाणे आकारणी करण्यात येईल.

सार्वजनिक बांधकाम विभाग मंगलकार्यालये / सभागृहाचे भाडे आकारणे बाबत :-

मा.उपायुक्त (सा) :- महानगरपालिका हद्दीतील मंगल कार्यालये महावीर कलादालन, आंबेडकर स्मारक, मनपा हॉल, विनामूल्य देण्यात येवू नये.

मा.उपायुक्त (कर) :- टिळकरोड वरील आंबेडकर स्मारक धार्मिक कामाकरीता लग्न समारंभा करीता उपलब्ध करुन देणे बंद केलेले आहे.

मा.उपायुक्त (सा) :- गरजवंत गरीबांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आंबेडकर स्मारक देण्यात येते. लग्नासाठी देत नाहीत.

मा.श्री.गव्हाळे :- आंबेडकर स्मारक हे लग्न समारंभासाठी मिळणार नाही. अशा प्रकारचा तेथे फलक लावणेंत यावा. काही ठिकाणी लग्न समारंभा साठी महानगरपालिका मालकीच्या शाळा दिल्या जातात.

श्री.गुळवे, प्रशासनाधिकारी :- लग्न समारंभासाठी महानगरपालिका शाळा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत. झेंडीगेट येथील शाळा सुटीच्या दिवशी लग्न व इतर समारंभासाठी दिल्या जातात. महानगरपालिकेच्या शाळा या सुशोभित केलेल्या आहेत. शाळा दिल्यास नुकसान होते. अन्न पदार्थांची घाण सांडुन विद्यार्थ्यांना रोगराई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शाळेत अत्यंत घाण करतात साफसफाई व्यवस्थित केली जात नाही. माशांचे प्रमाण जास्त वाढते. भिंती घाण केल्या जातात. त्यामुळे शाळेच्या इमारती देण्यात येवू नयेत.

मा.सभापती :- ज्या स्लम एरिया मध्ये महानगरपालिका मालकीचे मंगलकार्यालय / रिकामी जागा उपलब्ध नाही तेथील शाळेतील फक्त पटांगण शाळेच्या सुटीच्या दिवशी लग्न समारंभ व इतर समारंभासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे. यासाठी रक्कम रु.२,०००/- रु.डिपॉझिट व ५००/- रु. भाडे आकारावे.

मा.श्री.गणेश भोसले :- माळीवाडा विभागातील सौभाग्य सदन मंगलकार्यालय लग्न समारंभा करीता आपण भाडयाने देतो काय ? महानगरपालिकेत विचारणा केली तर मंगल कार्यालये बंद आहे असे सांगतात. परंतु मी तेथे अलिकडच्या काळात चार-पाच वेळेस लग्नास जावुन आलो आहे.

श्री.मगर :- सौभाग्य सदन मंगलकार्यालय बंद आहे. आपण लग्नाकरीता सौभाग्य सदन देत नाही.

**सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना :-**

मा.श्री.गव्हाळे :- सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील लोकांना प्रमाणपत्र देतांना जादा प्रमाणात शुल्क आकारणी केली जाते. प्रमाणपत्र विनामूल्य दिले गेले पाहिजे.

मा.उपायुक्त (सा) :- दारिद्रय निर्मुलन प्रमाणपत्र हे आपण विनामूल्य देत आहोत. परंतु महानगरपालिकेने दिलेले प्रमाणपत्र जपुन ठेवणे हे संबंधितांची जबाबदारी आहे. प्रथम दिलेले प्रमाणपत्र हरवल्या / गहाळ झाल्यानंतर दुस-या प्रती करीता नागरिक इकडेस अर्ज करतात. प्रमाणपत्र व्यवस्थित हाताळणे / ठेवणे ही संबंधितांची जबाबदारी आहे.

मा.उपायुक्त (कर) :- एका प्रमाणपत्राची संगणकावर प्रत काढणे करीता कमीत कमी २० मिनीटे लागतात. एका वेळी ५ ते ६ हजार नावांची यादी पहावी लागते. काम अतिशय किचकट असल्यामुळे सुचविलेली फी योग्य आहे.

मा.श्री.गव्हाळे, मा.श्री.रवि कांबळे :- मा.शासनाकडुन देण्यात येणा-या प्रमाणपत्रासाठी अतिशय कमी प्रमाणात शुल्क आकारले जाते. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रांकरीता २००/- रुपये जास्त होतात. त्यात कमी करुन ५० रुपये ठेवण्यात यावे.

**जकात विभाग :-**

मा.सभापती :- महानगरपालिकेच्या ४ मुख्य जकात नाक्यावर मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये-जा चालू असते. साधारणत: दीड हजार ते दोन हजार गाड्या दैनंदिन ये-जा करीत असतात त्या प्रमाणात पारगमनाची वसूली होत नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- पारगमनात वाढ झाली तर ठेकेदाराकडून जादा ठेक्यापोटी वाढीव रक्कम घेणार काय ?

उपायुक्त (सा) :- पारगमनापोटी ६ चाकी वाहनांपर्यंत ६० रुपये व त्यापुढील वाहनांसाठी १०० रुपये आपण वसूल करतो. ४०७ मॅक्स, पिकअप यांचेकडुन आपण प्रतिवाहन ६० रुपये घेतो. ६ चाकी वाहनांची संख्या जास्त आहे. त्यांचेकडुन सरसकट १०० रुपये वसूल केले तर ७ कोटी रुपये वाढतील. जकात टेंडर गेलेले आहे. जकात टेंडर घेणाराला जकात वाढवुन देणार का हा प्रश्न उपस्थित होईल. हा प्रश्न जनरल बोर्डापुढे जावुन नंतर मा.शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावा लागेल. मंजूरी आल्यानंतर मग वाढीव दर लागू करता येतील.

मा.सभापती :- मंजूर.

**वसूली विभाग :-**

मा.श्री.बाळासाहेब पवार :- अहमदनगर महानगरपालिकेत घरपट्टी पाणीपट्टी, साफसफाई कर रस्ताबाजू फी असे अनेक कर महानगरपालिका वसुल करते. रस्ताबाजू वसुल करतांना तेथील लोकांकडुनच कर घ्या. ज्या रस्त्यांच्या बाजुला कोणीही बसुन विक्री करत नाही. तेथील नागरिकांकडुन हा कर घेणे अन्यायकारक आहे. रस्ता कर या विषयावर सर्वसाधारण सभेत चर्चा करावी.

उपायुक्त (सा) :- ५ टक्के प्रमाणे रस्ताबाजू वसुल केली तर महानगरपालिकेस २ कोटी रुपयांचे उत्पन्न वाढणार आहे.

मा.श्री.दगडू पवार :- अहमदनगर महानगरपालिकेने सध्या जकातीचा ठेका दिलेलाच आहे. जकात ठेकेदाराकडुन जादा वसुली करा. हा ५ टक्के कर सामान्य जनतेकडुन वसुल करु नका.

मा.श्री.गव्हाळे / बाळासाहेब पवार :- ५ टक्के ऐवजी २ टक्के करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- रिटेबल व्हॅल्यु कशी काढतात.

श्री.निंबाळकर :- संबंधितांने केलेल्या बांधकामाचा प्रकार (पत्रा शेड, लोड बेरींग, आर.सी.सी.) त्याचा वापर व्यावसायिक, घरगुती कशा प्रकारे आहे यावर तसेच शासनाने केलेल्या झोन पध्दतीतील दरानुसार दर ठरविले जातात. चार झोनसाठी शासनाने वेगवेगळे दर ठरविलेले आहेत.

**रक्तघटक निर्मिती सेवा सुरु करणे :-**

मा.श्री.बाळासाहेब पवार :- रक्तघटक निर्मीती व सवलत पत्र म्हणजे काय ?

डॉ.श्री.बोरगे :- एखाद्या रुग्णास संपुर्ण रक्ताची आवश्यकता नसते. रक्तातील काही ठराविक घटक कमी झाल्यास ते त्या रुग्णास देणे आवश्यक असते. त्यात PCV, FFP, PLATELET, WHOLE BLOOD असे प्रकार येतात.

मा.श्रीमती.मालन ढोणे :- रक्त घटकासाठी सवलत पत्र कोणास मिळते.

उपायुक्त (कर) :- ज्या कोणी व्यक्तीने यापुर्वी आपल्या ब्लड बँकेत रक्तदान केलेले असते अशा व्यक्तींना सवलत पत्र दिले जाते. सवलत पत्र असल्यास २५० रुपये व सवलत पत्र नसल्यास ४००/- रुपये प्रमाणे शुल्क आकारले जाते.

मा.श्री.गणेश भोसले :- आपल्या ब्लड बँकेमधुन रक्त घेताना जादा पैसे मागणी करतात.

उपायुक्त (सा) :- मी अहमदनगर महानगरपालिकेत बदली होवुन आल्यापासुन साधारणत: दोन वर्षापासुन आज पर्यंत तक्रार आलेली नाही. आपल्याकडे लेखी तक्रार आली असल्यास मला लेखी प्रत द्या.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- आजच्या स्थायी समिती मध्ये चालू असलेल्या बजेटच्या विषयाचे रेकॉर्डींग करणेंत यावे. म्हणजे नंतर कधी काळी चर्चेची आवश्यकता लागल्यास अडचण भासणार नाही. संपुर्ण चर्चा रेकॉर्ड करण्यात यावी.

उपायुक्त (सा) :- महानगरपालिकेच्या सर्व साधारण विशेष सभेचे रेकॉर्डींग केले जाते. स्टॅंडींग कमिटीचे रेकॉर्डींग करण्याची पध्दत नाही.

**दिनांक १६/०७/२००९ रोजी दुपारी ३-०० वाजता मा.स्थायी समिती सभागृह येथे बजेट बाबतच्या विशेष सभेस पुन्हा सुरुवात झाली.**

उपायुक्त (सा) :- अहमदनगर महानगरपालिकेचे बजेट तयार करतांना शहरातील मुख्य रस्त्यांवर भर दिलेला आहे. त्यांची कामे झाली पाहिजे. शहरातील मुख्य ७ रस्त्यांची कामे बजेट संपल्यानंतर झाली किंवा नाही हे पाहिले पाहिजेत. नगरसेवकांची जबाबदारी आहे. काही रस्त्यांची कामे अपुर्ण आहेत. त्यावर भर देण्यांत आलेला आहे. शहरामध्ये ठोक दिसणारी कामे झाली पाहिजेत म्हणजे महापौर कोण ,उपमहापौर कोण, स्थायी समिती सभापती कोण, यांची नावे निघतात.

मा.श्री.पोपट बारस्कर :- गांधी नगर ते बोल्हेगाव हा रस्ता अत्यंत रहदारीचा असुन डी.पी.रोड मधील आहे. सदरच्या रस्त्याचे डांबरीकरण सुशोभिकरण करण्यांत यावे. त्याचा समावेश बजेटमध्ये करावा.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- मल्हार चौक ते कायनेटीक चौकापर्यंतच्या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे झालेले आहे.

उपायुक्त (सा) :- रस्त्याचे काम निकृष्ठ झाले आहे असे आपण म्हणु शकत नाही. त्या रस्त्याचे मटेरियल गुणवत्ता तपासणीसाठी गुणनियंत्रण विभागाकडे पाठवुन त्यांनी निकृष्ठ दर्जाचे मटेरियल आहे असा अहवाल दिल्यानंतरच आपण निकृष्ठ काम झाले असे म्हणु शकतो.

मा.श्री.गव्हाळे :- कोणताही रस्ता करतांना रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटार असावी. म्हणजे पावसाचे पडणारे पाणी रस्त्यावर न थांबता वाहुन जावुन रस्ते कोरडे राहतील परिणामी रस्त्याची झीज होणार नाही. रस्ते जादा काळ टिकतील.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- शहरातील मुख्य ७ रस्ते डांबरीकरण मजबुतीकरणासाठी घेतलेले आहेत. त्या रस्त्यांसाठी लागणारी बजेट तरतुद २८४ लक्ष करण्यात आलेली आहे. सदरची तरतुद ही अत्यंत कमी आहे. एकाच रस्त्याचा खर्च एवढा होवु शकतो. आणि आपण त्या बजेट मध्ये ७ रस्त्यांचे अंदाजपत्रक केलेले आहे. तरतुद पुरेशी नाही.

उपायुक्त (सा) :- आता सध्या फक्त तरतुद करुन ठेवलेली आहे. शासनाची रस्त्याबाबत एखादी स्कीम आल्यानंतर त्यातुन खर्ची टाकण्यात येईल.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- बांधकाम परवानगी देताना वसुल करण्यात येणारा विकास निधी इतर कामावर वर्ग करता येतो का ?

श्री.कर्डिले :- होय इतर कामावर वर्ग करता येतो.

श्री.धोंगडे :- रस्ते, बागा, या व इतर मोठ्या भांडवली खर्चासाठी विकास भार जमा झालेपोटी येणारी रक्कम कुठल्याही भागात वापरता येते.

मा.श्री.पोपट बारस्कर :- बजेटमध्ये दाखविलेले ७ रस्ते यांची निवड कशा पध्दतीने केली.

श्री.मगर :- संपुर्ण शहरातील जास्त वाहतुकीचे रस्ते निवडले आहेत.

उपायुक्त (सा) :- उपनगरातील काही रस्ते घेण्यात यावेत.

मा.श्रीमती.मालन ढोणे :- चाँदसुलताना हायस्कुल येथील रोडचे चालू असलेले काम बंद का करण्यात आले.

श्री.मगर :- सध्या पावसाचे दिवस असल्याने डांबरीकरणाचे काम बंद करण्यात आलेले आहे.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- शहरातील काही कामांबाबत वर्क ऑर्डर होवुनही कामे चालू झालेली नाहीत.

श्री.मगर :- कामे चालू करण्याबाबत संबंधित ठेकेदारांना पुन्हा एकदा पत्र देवू.

**गलिच्छ वस्ती सुधारणा :-**

मा.श्रीमती.ढोणे मालन :- अहमदनगर शहरातील गलिच्छ वस्त्यांमध्ये कुठलेही नागरी सुविधेचे काम करतांना प्रथम तेथील संपुर्ण अतिक्रमण काढण्यात यावीत. नंतरच कामे सुरु करण्यात यावीत. अतिक्रमण काढतांना सर्वाची सरसकट अतिक्रमणे काढली जावीत.

उपायुक्त (सा) :- स्लम एरियात काम करतांना नाली असो रस्ता असो कुठलिही सुधारणा असो अतिक्रमण काढुनच काम करण्यात यावे.

**पाणी पुरवठा विभाग :-**

मा.श्री.लोंढे शिवाजी :- केडगांव विभागातील जुन्या टाक्या झालेल्या नाहीत. तर नविन टाक्या कधी करणार. काही टाक्यांची टेस्टींग झालेली नाही.

श्री.निकम :- केडगांव विभागाला सध्या ७ - ८ दिवसांनी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. पिण्यासाठी पाणी अपुरे असल्याने टाक्यांचे टेस्टींग करण्याकरीता पाणी उपलब्ध न झाल्याने टेस्टींग घेतली नाही.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- पाण्यासाठी जलमापक आवश्यक आहेत. वितरण व्यवस्था ठिक नाहीत. सर्व नागरिकांना समप्रमाणात पाणी मिळत नाही. मिटर सिस्टीम ठेवावी. त्यामुळे आवश्यक पाण्याचाच वापर होईल.

उपायुक्त (सा) :- घरगुती नळांना मिटर बसविणे शक्य नाही. आणि बसविलेच तर ते सक्सेस होत नाही. आपल्या पाण्याच्या टाक्या रेग्युलर पुर्ण पणे भरत नाहीत.

मा.सभापती :- मुकुंदनगर दर्गादायरा विभागासाठी प्रस्तावित असलेली पाण्याच्या टाकी बाबतची स्थिती काय आहे ?

श्री.निकम :- सदर टाकी बांधकामा बाबत टेंडर काढुन सदरचे टेंडर मा.स्थायी समितीकडे मंजूरीस आहे. मंजूरी झाल्यानंतर काम सुरु होवू शकेल.

मा.सभापती :- मुकुंदनगर एरियामध्ये पुर्वी पी.व्ही.सी.लाईन टाकण्यात आलेल्या आहेत. सदरच्या लाईन जुन्या झालेल्या असल्याने वारंवार फुटतात. त्यामुळे घाण पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. संपुर्ण पी.व्ही.सी.लाईन बदलणे अत्यंत गरजेचे आहे.

श्री.निकम :- मुकुंदनगर भागातील पी.व्ही.सी.लाईन बदलाव्या लागणार आहेत. यु.आय.डी. एस.एस.एम.टी. अंतर्गत पी.व्ही.सी. लाईन बदलण्याचे काम चालू आहे.

**आरोग्य व वैद्यकीय सेवा :-**

मा.श्री.बाळासाहेब पवार :- बजेटमध्ये आरोग्य विभागाकरीता दाखविण्यांत आलेली बजेट तरतुद पुरेशी आहे काय ?

मा.श्री.शिवाजी लोंढे :- शहरामध्ये आरोग्य विषयक कुठलेही काम करतांना आरोग्य विभागाने सतर्क राहुन योजना सुरु केली पाहिजे. डास निर्मुलना करीता फवारणी, धुरीकरण करणे आवश्यक आहे.

उपायुक्त (कर) :- शहरातील ज्या भागात फवारणी करणे आवश्यक असेल तेथे डासांची घनता जर वाढलेली असेल तर आपण फवारणी करतो. भिंगार नाल्यात डास निर्मुलनासाठी गप्पी मासे सोडण्यात आलेली आहेत. शहरातील लहान मोठे नाले, गटारी व इतर ठिकाणी फवारणी करतो.

उपायुक्त (सा) :- शहरात ज्या ज्या ठिकाणी फवारणी फॉगींग धुरीकरण केले जाते. त्या त्या भागातील नगरसेवकांच्या दिनांकित स्वाक्ष-या आणण्यात याव्यात. अशी संबंधीत फवारणी करणा-या कामगारांना सूचना देण्यात याव्यात.

मा.श्री.गणेश भोसले :- महानगरपालिकेतील कर्मचारी फवारणीचे काम असो, किंवा कोणतेही असो बोलाविले शिवाय फवारणी साठी येत नाहीत.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- वाढीव हद्दीतील भागात कचरा गाड्या वेळेवर येत नाहीत. कचरा टाकण्यासाठी कुंडया नाहीत. टाकलेला कचरा वेळेवर उचलला जात नाही. सांगुनही काम केले जात नाही.

श्री.मेहेत्रे :- उपनगरात कचरा गोळा करण्यासाठी गाड्या जातात जेथे गाड्या जाणार नाहीत तेथे आपण कचरा कुंड्या ठेवणार आहोत. वॉर्डातील कचरा गोळा करण्यासाठी आपण कचरा ढकलगाडया मागविलेल्या आहेत.

उपायुक्त (सा) :- शहरातील कचरा गोळा करण्या करीता नेमलेल्या गाडयांचे वेळापत्रक तयार करुन सर्व सन्माननीय सभासदांना देण्यात यावेत. वॉर्डातील नगरसेवक तेथील रहिवाशांनी कचरा, कचरा गोळा करण्या करीता येणा-या गाडीतच टाकावा इतरत्र कोठेही अस्ताव्यस्त कचरा टाकु नये अशा बाबत सूचना करतील.

मा.सभापती :- जी घंटागाडी वॉर्डात कचरा गोळा करण्यासाठी जाईल. त्या गाडीच्या ड्रायव्हर कडे रजिस्टर देवून त्याला तेथील संबंधितांच्या स्वाक्ष-या घेणे बाबत कळवावे.

उपायुक्त (सा) :- तसे करता येणार नाही. काम अतिशय किचकट होईल. घंटागाडीला कचरा गोळा करण्यासाठी जादा वेळ जाईल परिणामी ठरवुन दिलेल्या सर्व भागातील कचरा वेळेत गोळा केला जाणार नाही.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- अहमदनगर शहरातील मुकुंदनगर झेंडीगेट येथील नागरिकांचा डेंग्यु रोगाने मृत्यु झाला. डेंग्यु बाबत माहिती देण्यात यावी.

डॉ.श्री.टेकवाणी :- ज्यांचा मृत्यु झाला तो डेंग्यु डास चावल्याने झालेला नाही. डेंग्यु हा डास चावल्याने होतो. प्रथमत: रुग्णास ताप येवुन डोके दुखी अंग दुखी सुरु होते. जादा ताप राहील्याने कधी कधी रक्तस्त्रावही होतो. डेंग्युचे निदान झाल्याशिवाय डेंग्यु झाला किंवा नाही हे सांगता येत नाही.

उपायुक्त (कर) :- डास निर्मुलनासाठी वेळच्यावेळी कचरा उचलणे, ॲबेट टाकणे, फवारणी, धुरीकरण करणे इत्यादी कामे सुरु केलेली आहेत.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- संपुर्ण शहराचे नियोजन करण्यात यावे. डास निर्मुलन फवारणी करीता आरोग्य विभागास चार-चार वेळा सांगावे लागते.

मा.सभापती :- मुकुंदनगर भागात असणा-या हौदांमध्ये औषध टाकले जात नाही.

उपायुक्त (कर) :- शहरातील आरोग्य विषयक समस्या व डास निर्मुलना करीता महानगरपालिकेने एक हेल्पलाईन चालू केलेली आहे. फोन आल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी कार्यवाही करण्यात येते.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- शहरामध्ये गोळा होणारा कचरा हा काही ठिकाणी जाळण्यात येतो.

उपायुक्त (सा) :- सदरचा विषय हा बजेट मध्ये नाही कृपया आपण विषयांतर करु नये.

**घनकचरा व्यवस्थापन व वाहतुक :-**

मा.श्री.गव्हाळे :- पुर्ण वॉर्डात गाडी फिरत नसल्याने कचरा गोळा करण्या करीता कचरा कुंडया बसवाव्यात.

उपायुक्त (कर) :- महानगरपालिकेने ७०० ढकलगाड्या खरेदी करण्याची तरतुद केलेली आहे. आता १२० ढकलगाडया येणार आहेत. ४५ कंटेनर खरेदी करावयाचे आहेत. चार निविदा काढुनही प्रतिसाद मिळालेला नाही. सर्व ठिकाणी कंटेनर दिले जातील.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- कचरा वाहतुक करणा-या गाडयांना ड्रायव्हर नाहीत. तर नविन गाड्या कशा खरेदी करणार.

उपायुक्त (कर) :- महानगरपालिकेने खरेदी केलेल्या ३२ घंटागाड्या कंत्राटी पध्दतीने चालवावयास दिलेल्या आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- शहरात बसविण्यांत येणा-या फायबर मुता-या कशा पध्दतीने व कुठे - कुठे बसविणार.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- एकवीरा चौकात बसविण्यात आलेल्या फायबर मुतारीमुळे परिसरात अतिशय घाण, दुर्गंधी सुटत आहे. सदर मुतारी वेळेवर साफसफाई केली जात नाही. तेथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सदर मुतारी बसविण्याचे ठिकाण हे अतिशय चूकीचे झालेले आहे.

उपायुक्त (सा) :- सदर चौकातील मुतारीमुळे जाणा-या येणा-या नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

मा.श्रीमती.मालन ढोणे :- मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कार्यालयाजवळील मुतारी सध्या दिवस नाही.

श्री.सातपुते :- सध्या ती मुतारी पाडलेली आहे. नविन बांधावयाची आहे.

**सुधार योजना (नगररचना) :-**

उपायुक्त (सा) :- या योजने अंतर्गत करावयाच्या कामाचे सर्व प्रस्ताव तयार आहेत. सर्व साधारण सभेपुढे येणार आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- बुरुडगांव भाजी मार्केट येथील जागा खुप मोठी आहे. सदर जागेचा योग्य पध्दतीने विकास झाला पाहिजे.

मा.श्री.गव्हाळे :- संजय नगर पंचशील वाडी झोपडपट्टीतील नागरिकांसाठी करावयाची घरकुल योजना तेथील जागेतच झाली पाहिजे.

श्री.मेहेत्रे :- पंचशील वाडी येथे जाणे येणे करीता रस्ता नाही. त्यामुळे तेथे घरकुल योजना करता येत नाही. इतर ठिकाणी घरकुल योजना राबवुन तेथे त्यांचे स्थलांतर करु.

उपायुक्त (कर) :- पंचशील वाडी झोपडपट्टीतील रहिवाशांना सदनिका देणार आहोत. शहर झोपडपट्टी मुक्त करावयाचे आहे. तेथे सर्वच सुविधा दिल्या जातील.

**पर्जन्य जलनि:सारण (बांधकाम) :-**

मा.श्री.लोंढे शिवाजी :- पिंपळगाव माळवी तलाव, सोनेवाडी तलाव यातील गाळ काढण्यात यावा.

उपायुक्त (सा) :- सदर तलावातील गाळ काढणेसाठी जास्त खर्च येणार आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता आवाक्याच्या बाहेरची गोष्ट आहे.

श्री.निकम :- सोनेवाडी तलाव महानगरपालिकेच्या ताब्यात नाही. शासनाच्या ताब्यात आहे. महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेकरीता मा.जिल्हाधिकारी सो, यांचेकडेस प्रस्ताव सादर करावा लागेल.

उपायुक्त (कर) :- सदर तलाव महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे बाबत मा.शासन स्तरावर पत्रव्यवहार करावा.

मा.सभापती :- मुकुंदनगर दर्गादायरा भागात मागील वर्षीच्या पावसाळयात घरा घरात पाणी शिरले होते. मुकुंदनगर येथे गटार होणे अत्यंत आवश्यक आहे.

उपायुक्त (कर) :- मुकुंदनगर येथील नाला बीआरजीएफ मध्ये प्रस्तावित आहे. महानगरपालिका सभेपुढे मंजूरीस आहे.

मा.सभापती :- सदर नाल्यासाठी तरतुद करण्यात यावी. केंद्राने मंजूरी दिलेली आहे.

श्री.सातपुते :- मुकुंदनगर दर्गादायरा भागात गटार होणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकात ८० लाखाची तरतुद आहे. बी.आर.जी.एफ मध्ये प्रस्तावित आहे.

उपायुक्त (कर) :- मा.शासनाकडुन निधी येणार आहे. निधी आल्यानंतर काम सुरु करु.

**अतिक्रमण विभाग :-**

मा.श्री.गणेश भोसले :- महानगरपालिका हद्दीतील अतिक्रमणे काढणेसाठी नेमणुक केलेल्या पथकास संरक्षण आहे काय ? अतिक्रमण काढतांना कर्मचा-यांना हाणामारीचे प्रकार होतात.

उपायुक्त (कर) :- महाराष्ट्र शासनाकडुन फेरीवाल्यां बाबत विशेष धोरण ठरविले जात आहे. फेरीवाल्यांवर नियंत्रणासाठी समिती गठीत केलेली आहे. शासन दरबारी याबाबत अनेक बैठकाही झालेल्या आहेत. फेरीवाल्यां बाबत उपविधी तयार करण्याचे काम चालू आहे. सदर योजने अंतर्गत महानगरपालिकेस आवश्यकता भासल्यास स्वतंत्र पोलिस व चौकी उपलब्ध करुन घेता येवू शकते. परंतु त्यासाठी येणारा खर्च हा महानगरपालिकेला करावा लागणार आहे.

**उद्यान विभाग :-**

मा.श्री.बाळासाहेब पवार :- हद्दवाढ होवुनही आजपर्यंत हद्दवाढीतील नागरिकांसाठी उद्यान नाही.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- केडगांव , बुरुडगांव, मुकुंदनगर येथेही उद्यान विकसित करण्यात आलेले नाही.

श्री.गोयल :- सावेडी, मुकुंदनगर येथील उद्यानांचा प्रस्ताव नगररचना विभागाकडेस दिलेला आहे. उद्यानासाठी जागा पाहणी चालू आहे. जागा निश्‍चितीनंतर उद्यान विकसित करण्यात येईल.

मा.सभापती :- सारसनगर, मुकुंदनगर, केडगांव, सावेडी येथील उद्यानांसाठी बजेटमध्ये तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.गव्हाळे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, यांचे सुशोभिकरण करण्यात यावे.

मा.श्री.दगडू पवार :- महालक्ष्मी उद्यानात अस्वच्छता असते. साफसफाई केली जात नाही. कारण विचारले तर पुरेसे कर्मचारी नाहीत म्हणुन सांगतात.

श्री.गोयल :- आमचे कर्मचारी अतिक्रमण विभागाकडे गेलेले आहेत. उद्यान विभागाकडे अपुरा कर्मचारी वर्ग आहे. उपलब्ध कर्मचा-यांकडुन गार्डनची साफसफाई व इतर कामे केली जातात.

**अग्निशमन दल :-**

मा.श्री.शिवाजी लोंढे :- अग्निशमन विभागाकरीता सध्या असणा-या वाहनांची संख्या अत्यंत अपुरी आहे. ती वाढविण्यासाठी बजेट तरतुद करण्यात यावी. आपल्याकडील वाहनांची कार्यक्षमता वाढविण्यांत यावी. बाहेरील अग्निशमन दलाच्या गाड्या लवकर येतात. आपल्या गाड्या वेळेवर पोहचू शकत नाही.

श्री.कारले :- आगी बाबत कॉल मिळाल्यानंतर गाडी अंतरानुसार ५ ते १० मिनीटात पोहोच होते. इतर ठिकाणची अग्निशमन वाहने आपण बोलवत नाहीत. आपल्याकडील तिनही वाहने तातडीने जातात.

उपायुक्त (सा) :- लागलेल्या आगीचे स्वरुप पाहुन आपल्या अग्निशमन दलाला लागलेली आग आटोक्यात येणार नसेल तर प्रशासन दुस-या ठिकाणच्या अग्निशमन दलाला फोन करुन पाचारण करण्यात येते. कधी कधी रस्ता वाहतुकीत अडथळा आल्याने आगीच्या ठिकाणी जाण्यास उशीर होतो. यापुढे वाहने वेळेवर पोहोचतील या बाबत दक्षता घेण्यात यावी.

**संगणक विभाग :-**

मा.श्री.शिवाजी लोंढे :- या विषयावर माझा आज अभ्यास झालेला नसल्याने उद्या या विषयावर प्रश्न विचारतो.

**शिक्षण विभाग :-**

मा.श्री.शिवाजी लोंढे :- महानगरपालिके मार्फत चालविल्या जाणा-या शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता कमी आहे. महानगरपालिकेच्या एकुण शाळा कीती ?

उपायुक्त (सा) :- महानगरपालिका शाळेची गुणवत्ता कमी आहे असे नाही. शाळांची सुधारणा झालेली आहे.

श्री.पठाण :- महानगरपालिका शिक्षण मंडळाकडील शाळांचा दर्जा सुधारलेला आहे. मागील वर्षी झालेल्या शिष्यवृत्ती परिक्षेत मनपा शाळेतील दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले आहेत. त्यांना शिष्यवृत्ती चालू आहे. सर्व शाळेतील विद्यार्थी पट कमी झालेला आहे. महानगरपालिकेच्या एकुण ९ शाळा आहेत. ७ मराठी माध्यम व २ उर्दु माध्यमाच्या आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- प्रत्येक शाळेची तपासणी करावी. ९ शाळेत विद्यार्थी कीती आहेत ?

श्री.पठाण :- एकुण विद्यार्थी संख्या १००० ते ११०० च्या दरम्यान आहे.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- शाळेतील पट सुधारणेसाठी प्रयत्न करावेत.

मा.श्री.पोपट बारस्कर :- खाजगी शाळेवर आपल्या शिक्षण मंडळामार्फत व्हीजीट देत जाव्यात.

**क्रीडा विभाग :-**

मा.श्री.शिवाजी लोंढे :- सांस्कृतिक कार्यक्रम व इतर कार्यक्रमांसाठी महानगरपालिके मार्फत अनुदान देण्याचे कारण काय ?

उपायुक्त (सा) :- महानगरपालिका कायद्यानुसार आम्ही शिफारस करीत असतो. महानगरपालिका सभेने निर्णय घ्यावयाचा असतो.

मा.श्री.गणेश भोसले :- आपल्या क्रीडा विभागा मार्फत व्यायाम शाळेसाठी लागणारे साहित्य दिले जाते काय ?

श्री.फिलीप्स :- आर्थिक तरतुद शिल्लक असल्यास साहित्य खरेदी बाबतचा प्रस्ताव स्टोअर विभागाकडेस पाठवुन स्टोअर मार्फत खरेदी केली जाते. व्यायाम शाळेची जागा पाहुनच साहित्य दिले जाते.

**प्रसिध्दी / महिला व बालकल्याण विभाग :-**

मा.श्री.शिवाजी लोंढे :- महिला व बालकल्याण समितीला करण्यात आलेली ५० लाखाची तरतुद कमी असुन ती १ कोटी करण्यात यावी.

श्री.कर्डिले :- महिला व बालकल्याण विभागासाठी दि.३० डिसेंबर २००६ च्या मा.शासन निर्णयानुसार एकुण बजेटच्या ५ टक्के रक्कमेची तरतुद करता येते. आवश्यकता वाटल्यास त्यात नंतर वाढ करता येईल.

उपायुक्त (सा) :- महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत स्त्री जन्माचे स्वागत हे बजेट हेड तयार करण्यात यावे. त्यावर तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती :- महानगरपालिका हद्दीतील मिळकत धारकांकडे एकुण किती थकबाकी शिल्लक आहे. सन २००९-२०१० अखेर एकुण किती वसूल होईल. ७० टक्के पर्यंत वसुली व्हायला हवी.

श्री.कर्डीले :-मिळकतधारक यांचेकडेस घरपट्टी व पाणीपट्टी मिळून रु .१११.९२ कोटी थकबाकी आहे.

श्री.निंबाळकर :- सन २००९-२०१० अखेर जास्तीत जास्त वसुली साठी प्रयत्न केले जातील.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- अहमदनगर शहरामध्ये नागरिकांना सध्या ज्या प्रमाणे पाणी मिळत आहे. त्या प्रमाणात पाणी पट्टी वसुल करण्यात यावी.

मा.श्री.गणेश भोसले :- जकातीचा ठेका गेल्यानंतर जकात विभागाकडील कर्मचारी वॉर्डात वसुलीसाठी देण्यात यावेत. जास्तीत जास्त वसुल होईल याकडे लक्ष द्यावे.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- केडगांव भागामध्ये शेती मोठ्या प्रमाणावर असल्याने वसुलीसाठी वाढलेल्या झोन प्रमाणे झोन ४ मधुन झोन क्रमांक ३ मध्ये घेण्यात यावे.

मा.सभापती :- दैनंदिन वसुलीचा दर १५ दिवसांनी अहवाल घेण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- मार्केट रस्ताबाजू फी काय प्रकार आहे.

श्री.कर्डीले :- तात्पुरत्या स्वरुपात रस्त्याच्या बाजूला बसुन विक्री करणा-यांकडुन आपण दैनंदिन फी आकारणी करतो. ती कमी अधिक प्रमाणात वसुल होते.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- रस्ताबाजू फीची मागील वसुली अत्यंत कमी प्रमाणात आहे.

उपायुक्त (सा) :- रस्ताबाजू फी वसुली कामी महानगरपालिकेने जर ठेका दिला तर सध्या वसुल होत असलेल्या रक्कमेच्या चार पट उत्पन्न वाढेल. त्यात महानगरपालिकेचा फायदा होणार आहे. मार्केट विभाग ठेक्याने देण्यात यावा.

मा.श्री.गणेश भोसले :- शहरातील संपुर्ण गाळे धारकांकडुन दरमहा किती उत्पन्न मिळते.

श्री.निंबाळकर :- दरमहा उत्पन्न कमी प्रमाणात मिळत आहे. गाळयांची थकबाकी जास्त आहे.

उपायुक्त (सा) :- ३ वर्षानंतर गाळेभाड्यात वाढ करण्यात आली पाहिजे.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- गाळे भाडयात थकबाकी शिल्लक ठेवू नका.

मा.सभापती :- महानगरपालिका मालकीच्या मंगलकार्यालयांचे उत्पन्न कमी आहे. अनधिकृत बांधकामांना दंड वाढ करण्यात यावी.

मा.श्री.गणेश भोसले :- जाहिरात कराचा सर्व्हे करुन ठेका देण्यात यावा.

उपायुक्त (सा) :- महानगरपालिका शाळेचे काही वर्ग इतर संस्थांना दिलेले आहेत. त्यांचेकडुन भाडे वसुली होत नाही. थकबाकीत वाढ होत आहे.

मा.सभापती :- शाळांना मिळणा-या अनुदानातुन भाडे कपात करण्यात यावी.

श्री.पठाण :- शिक्षण मंडळाचे काही वर्ग माध्यमिक शाळांना दिलेले आहेत. माध्यमिक शाळा आपल्या अखत्यारीत येत नसुन जिल्हापरिषद अंतर्गत आहेत. त्यांना मिळणारे अनुदान आपल्या मार्फत मिळत नाही. परिणामी आपल्याला वसुल करता येत नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- अहमदनगर शहरातील विविध मोबाईल कंपन्यांनी उभारलेले टॉवर अधिकृत अनधिकृत किती ?

श्री.पवळे :- संपुर्ण शहरात ५५ ते ५७ अनधिकृत मोबाईल टॉवर आहेत.

उपायुक्त (सा) :- अनधिकृत मोबाईल धारकांना नोटीसा दिलेल्या आहेत. ११ मोबाईल टॉवर अधिकृत आहेत. उर्वरितांकडुन नियमानुसार दंड आकारणी करण्यांत यावी.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- अनधिकृत टॉवर काढुन टाकुन त्यांचेकडील सामान जप्त करण्यात यावे.

मा.श्री.दगडू पवार :- टॉवर उभारणारे मोबाईल कंपनी वाले बिल्डींग मालकांना हाताशी धरुन त्यांना पैसे देवून अनधिकृत टॉवर उभारतात.

श्री.बल्लाळ :- अनधिकृत मोबाईल टॉवर उभारला असल्यास आपण त्यांचेकडुन १.५० लाखापर्यंत दंड वसुल करु शकतो.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- अनधिकृत टॉवर वाल्यांना नोटीस काढण्यात याव्यात.

उपायुक्त (सा) :- अल्पसंख्यांक अनुदान नविन हेड तयार करणेत यावे.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- मा.मनपा सदस्य यांनी माहिती अधिकारात माहिती मागितल्यास सदर माहिती मिळणे कामी सदस्यांकडुन पैसे आकारु नयेत.

उपायुक्त (कर) :- माहिती अधिकारात माहिती मागविल्यामुळे आपणांस पैसे भरुनच माहिती दिली जाईल मा.सदस्यांना माहिती अधिकारात माहिती विनामूल्य द्यावी अशी कुठलीही तरतुद नाही.

मा.सभापती :- महापौर दुर्धर निधीवर केलेली तरतुद अतिशय कमी असुन ती रक्कम रुपये ५ लाख करण्यांत यावी. तसेच आकस्मिक खर्च निधी रक्कम रु.२ लाख करण्यात यावा.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- मा.मनपा सदस्यांना महानगरपालिका कायद्याचा व इतर कामकाजाचा अभ्यास करण्यासाठी महानगरपालिके मार्फत १ लायब्ररी सुरु करण्यात यावी.

उपायुक्त (कर) :- मनपा कर्मचा-यांकरीता अपघात विमा तरतुद वाढविण्यात यावी. सर्व कर्मचा-यांचा विमा उतरविण्यात यावा.

मा.सभापती :- कर्मचारी गट विमा योजना काय आहे.

श्री.कर्डीले :- ही योजना आपल्याकडे नाही.

मा.सभापती :- महानगरपालिका हद्दीतील नियमीत मिळकत भरणारे मिळकत धारकांचा विमा उतरविणे बाबत कार्यवाही करण्यात यावी. संबंधित नियमीत मिळकत कर भरणा-या नागरिकांना सदर बाबत माहिती देण्यात यावी. उनाड कुत्री बंदोबस्त करणे व दंशावर उपचार करणे करीता तरतुद रक्कम रु.२५ लाख करण्यात यावी. विद्युत साहित्य खरेदी हेडवर रक्कम रु.५० लाख ची तरतुद करण्यात यावी. पुना नाका ते केडगाव कायनेटीक चौक, स्वस्तीक चौक, मार्केट यार्ड चौक, सोलापूर चौक, डी.एस.पी. चौक, औरंगाबाद नाका या संपुर्ण रोडवर सेट्रल लायटीग करण्यात यावी. याच कामाबरोबर शहरातील आणखी चार महत्वाचे रस्त्यांवर सेंट्रल लायटींग करण्यात यावे. सदरचे काम बी.ओ.टी.

तत्वावर देण्यात यावे. नविन इलेक्ट्रीक पोल स्ट्रीट लाईट स्पॅन फिटींग या हेडवर रक्कम रु.७० लाखाची तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- सध्या प्रायोगिक तत्वावर नगर शहरातील एक मोठा रस्ता घेण्यात यावा.

श्री.कर्डीले :- बजेट पेक्षा जास्त रक्कमेचे प्रस्ताव मंजूर करुन घेतलेले आहेत. त्यांची देणी अद्याप बाकी आहेत. अशी मोठ मोठाल्या रक्कमेची बजेटवर वाढ करत गेले तर सरतेशेवटी बजेटचा ताळमेळ बसविता येणार नाही.अपेक्षित उप्तन्नाचा विचार करता खर्चाच्या रक्कमा वाढविता येणार नाही.

मा.सभापती :- जकातीचा ठेका गेल्यानंतर तिकडील कर्मचारी वसुली कामासाठी नेमुन जास्तीत जास्त प्रमाणात वसुल करण्यात यावा. दरमहा आढावा बैठका घेण्यात याव्यात. १०० टक्के वसुलीचे उद्यीष्टय ठेवण्यात यावे.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- वसुली बाबत नगरसेवकांची काहीही अडचण येणार नाही.

मा.सभापती :- घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत हायप्रेशर युनिट खरेदी या हेडवर रक्कम रु.२० लाखाची तरतुद करण्यात यावी. आणखी दोन मशिन्स खरेदी करण्यात याव्यात.

उपायुक्त (कर) :- रक्तघटक निर्मिती साठी बजेट वाढवावे लागेल. प्लाझमा सेंटर सुरु करावयाचे असल्याने त्यासाठी नियुक्त कर्मचारी यांचे वेतनासाठी तरतुद करावी लागेल.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- केडगाव येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार झाल्यानंतर धार्मिक विधीसाठी ठेवाव्या लागणा-या अस्थींसाठी रॅक तयार करण्यात यावेत.

उपायुक्त (कर) :- प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे बँक गॅरंटी करीता भरावयाच्या पैशांकरीता नविन हेड तयार करणे आवश्यक आहे. पर्यावरण अहवालावर रक्कम रु.३ लाखाची तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- नगर शहरास होणा-या पाणीपुरवठा योजनेवर नविन सुधारणा करणे आवश्यक आहे.

श्री.निकम :- विळद पंपिंग स्टेशन येथुन वाया जाणारे पाणी वापरात आणणे यु.आय.डी.एस. एस. एम.टी मधुन सर्व ठिकाणच्या पी.व्ही.सी.लाईन बदलण्याचे काम करावयाचे आहे.

मा.सभापती :- मुकुंदनगर दर्गादायरा भागातील पी.व्ही.सी.लाईन बदलणे आवश्यक आहे. रक्कम रु.५० लाखात काम होणार नाही. तरतुद वाढवावी लागेल.

श्री.निकम :- यु.आय.डी.एस.एस.एम.टी. अंतर्गत आपण सदर काम करणार आहोत. त्यामुळे बजेट वाढविण्याची आवश्यकता नाही.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- नविन हद्दवाढीतील भागात पाईप लाईन टाकणेचे बजेट वाढविण्यात यावे.

मा.सभापती :- शहरात नविन पाईपलाईन टाकणेत यावी. या हेडवर रक्कम रु.९० लाखाची तरतुद करण्यात यावी. वाढीव हद्दीत पाईपलाईन टाकणे करीता रक्कम रु.८० लाख करणेंत यावी. मागासवर्गिय कल्याणकारी योजनेतुन लालटाकी व सिध्दार्थनगर येथे पाण्याच्या टाकीचे बांधकाम करणेकरीता रक्कम रु.४० लाखाची तरतुद करण्यात यावी. सारसनगर येथील पाण्याचे टाकी करीता रक्कम रु.४० लाखाची तरतुद करण्यात यावी.

**दिनांक १७/०७/२००९ रोजी दुपारी ११-०० वाजता मा.स्थायी समिती सभागृह येथे बजेट बाबतच्या विशेष सभेस पुन्हा सुरुवात झाली.**

मा.सभापती :- कोंडवाडा अंतर्गत वैरण चारा खरेदी करणे करीता करण्यात आलेली तरतुद कमी आहे. ती वाढवुन रक्कम रु.५ लाख करण्यात यावी.

मा.श्री.शेंडगे :- अहमदनगर महानगरपालिके मार्फत करण्यात येणारा कोंडवाडा सध्या चालू नाही. शहरातील महत्वाच्या रस्त्यांवर जनावरे घोळका करुन बसलेली असतात. संपुर्ण रस्ता ब्लॉक करतात त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. रस्त्यात बसणारी फिरणारी जनावरे पकडुन कोंडवाडयात टाकण्यात आली पाहिजेत. त्यांच्या मालकांकडुन दंड वसुल करावयला हवा.

उपायुक्त (सा) :- महानगरपालिकेच्या कोंडवाडयाचे बांधकाम करावयाचे आहे. जनावरे आल्यानंतर चारा लागेल त्यासाठी तरतुद वाढवावी लागेल.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- कोंडवाडयासाठी महानगरपालिकेची जागा आहे काय ?

श्री.मेहेत्रे :- वडगाव गुप्ता रोड येथे महानगरपालिकेची जागा आहे. सदर जागेस कंम्पौंड वॉल बांधावा लागेल. कोंडवाडा बांधकामासाठी तरतुद वाढविणे आवश्यक आहे.

श्री.मगर :- कोंडवाडा बांधकामासाठी करण्यात आलेली तरतुद अतिशय कमी प्रमाणात आहे. एवढया तरतुदीत संपुर्ण जागेला वॉल कंम्पौंड जनावरांसाठी पत्राशेड (गोठा) पिण्याच्या पाण्याची सोय व इतर काही सुविधा कराव्या लागतील. त्यासाठी प्रस्तावित तरतुद अत्यंत अल्प आहे. प्रस्तावित तरतुदी मध्ये फक्त सदर जागेला तारेचे कंम्पौंड करावे लागेल.

उपायुक्त (सा) :- सदर जागा ही गावापासुन दुर असल्याने सदर ठिकाणी तारेचे कंम्पौंड चालणार नाही त्याला वॉल कंम्पौंडच करावे लागेल. पकडुन आणलेली जनावरे सुरक्षित ठेवावी लागतील.

श्री.मगर :- सदर कामासाठी कमीत कमी रक्कम रु.१५ लाखाची तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- बागेतील खेळणी खरेदी करणे व देखभाल या हेडवर रक्कम रु.३ लाखा ऐवजी रक्कम रु.१० लाखाची तरतुद करण्यात यावी.

उपायुक्त (कर) :- नविन खेळणी बसविणे व देखभाल साठी महिला व बालकल्याण समितीमध्ये तरतुद असते.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- उपनगरामध्ये अनेक छोटे मोठे ओपन स्पेस आहेत. काही ओपन स्पेसला वॉल कंम्पौंड केलेले आहेत. सदर ओपन स्पेस मध्ये वृक्षारोपन करण्यात यावे. छोटे छोटे ओपन स्पेस डेव्हलप करण्यात यावेत. वृक्षारोपन, वृक्ष संरक्षण व ट्रीगार्ड खरेदी हे दोन हेड करण्यात यावेत.

मा.सभापती :- ट्री गार्ड खरेदीच्या हेडवर रक्कम रु.३ लाखाची तरतुद करण्यात यावी. वृक्षारोपन हेडवर रक्कम रु.७ लाखाची तरतुद करण्यात यावी.

श्री.मगर :- रस्ते दुरुस्ती (पॅचिंग व मुरुम टाकणे) या हेडवर दर्शविण्यात आलेली तरतुद कमी आहे ती वाढविण्यात यावी.

उपायुक्त (सा) :- अहमदनगर शहरामध्ये सध्या काही रस्त्यांचे जे कॉक्रीटीकरणाचे काम चालू आहे/ झाले आहे. अशा काही कामांना व्हीजीट दिली असता कॉक्रीटी करणाचे काम अत्यंत निकृष्ठ

झालेली आहेत. काही ठिकाणी संपुर्ण खडी उघडी पडलेली आहे. पाहिजे त्या प्रमाणात कॉंक्रीटला जाडी दिलेली नाही.

श्री.मगर :- सध्या महानगरपालिकेतील कामे घेणा-या ९० टक्के ठेकेदारांना कोणत्याही प्रकारचे तांत्रिक ज्ञान नाही.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- शहरामध्ये विकास कामे चालू असतांना संबंधित विभागातील अभियंत्यांनी सदर कामावर देखरेख ठेवणे आवश्यक आहे. निकृष्ठ काम चालू असल्याचे निदर्शनास आल्यास चालू काम ताबडतोब बंद करावे. परंतु आपले महानगरपालिकेचे इंजिनिअर चालू कामांवर कधीच व्हीजीट देत नाहीत.

मा.श्री.गणेश भोसले :- महानगरपालिकेत काम करणा-या ठेकेदारांना तांत्रिक ज्ञान नाही. परंतु आपल्या पालिकेतील इंजिनिअरना एस्टिमेट सुध्दा करता येत नाही. याला जबाबदार कोण ? प्रत्येक चालू काम पहाणे ही इंजिनिअर यांची जबाबदारी आहे.

मा.श्रीमती.मालन ढोणे :- महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवर वारंवार खर्च होत असतांनाही ६ महिन्यापेक्षा जास्त काळ कोणताही रस्ता टिकत नाही. ६ महिन्याच्या आत त्यावर खड्डे पडायला सुरुवात होते. खर्च मात्र कायमस्वरुपी चालू असतो.

उपायुक्त (सा) :- एकदा रस्ता कॉंक्रीट केल्यानंतर ४ वर्ष पुन्हा त्या रस्त्यावर काम निघाले नाही पाहिजे. कामाची क्वालीटी सुधारायला हवी. बजेट नसतांना कामे करु नका विना बजेटच्या कामांना अडथळा करा. बजेट मंजूरी नंतरच प्रस्ताव सादर करावेत.

उपायुक्त (कर) :- ओपन स्पेस मध्ये कोणतेही काम करणे योग्य नाही. महानगरपालिके मार्फत ओपन स्पेस मध्ये कॉंक्रीटीकरण, पेव्हींग ब्लॉक बसविणे अशी कामे केली जातात. या कामांमुळे ओपन स्पेस मध्ये पडणारे पावसाचे पाणी तेथे न जिरता ते वाहुन जाते. त्यामुळे ज्या कामासाठी ओपनस्पेस टाकलेला असतो तसा त्याचा उपयोग होत नाही.

उपायुक्त (सा) :- नव्यानेच विकसित करण्यात येत असलेल्या गंगा उद्यान मध्ये लाल मातीचा ट्रॅक करण्यात यावा. तरच पायी फिरणा-या नागरिकांना त्याचा लाभ होईल. नगर शहरामध्ये मोठ मोठाल्या रस्त्यांवरही मोकळया जागेतही कॉंक्रीटीकरण केले जाते. असे न करता ज्या ठिकाणी चार चाकी वाहन जावू शकणार नाही. अशाच ठिकाणी कॉंक्रीट करण्यात यावे. इतर ठिकाणी कॉंक्रीट करण्यात येवू नये.

मा.सभापती :- रस्ते दुरुस्ती पॅचिंग व मुरुम टाकणे या हेडवर रक्कम रु.२५ लाखाची व रस्ते कॉंक्रीटीकरण या हेडवर रक्कम रु.२५ लाखाची तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.गव्हाळे विजय :- काटवन खंडोबा रोड ते आगरकर मळा या रस्त्यावर पुल तयार करण्यात यावा.

उपायुक्त (सा) :- पाईप लाईन रोड या रस्त्याचे काम करतांना रस्ता रुंदीकरण केले परंतु त्या रस्त्यावरील पुलाबाबत काहीही केलेले नाही.

श्री.मगर :- पाईप लाईन रस्त्यावरील पुलासाठी रक्कम रु.३५ लाखाचे एस्टिमेट तयार केलेले आहे.

उपायुक्त (सा) :- रस्ता रुंदीकरणात पुलाचा समावेश करावा.

मा.श्री.गव्हाळे विजय :- सिना नदीवरील ब्रिटीश कालीन पुलाशेजारी एक पुल आहे. सदर पुलाचे काम करावे.

श्री.मगर :- सदर कामासाठी निधी जादा लागेल. तिर्थक्षेत्र विकास निधी मधुन सदरचे काम करता येईल.

मा.श्री.गणेश भोसले :- नगर शहरातुन बुरुडगांव येथे जाणे करीता बुरुडगांव येथील पुलाचे काम करावे लागेल. पावसाळयात जाणेयेणेसाठी खुप गैरसोय होत आहे.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- पाईप लाईन रोड रस्ता कामाकरीता निधीची तरतुद करावी लागेल.

श्री.कर्डीले :- पाईप लाईन रोड रस्त्या एस्टिमेट तयार करतांना पुलासाठी तरतुद करण्यात आलेली नाही.

मा.श्री.कांबळे रवी :- केडगांव देवीकडे जाणा-या रस्त्यावरील पुलाचे काम करावे लागेल त्यासाठी निधीची तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती :- प्रभागात झोन निहाय किरकोळ दुरुस्तीकरीता रक्कम रु.१० लाखाची तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री.गणेश भोसले :- क्रीडा विभागाकडुन व्यायाम साहित्य मागितले असता वेळेवर मिळत नाही. क्रीडा साहित्य खरेदी करण्याकरीता करण्यात आलेली तरतुद अतिशय कमी आहे ती रक्कम रु.१५ लाख करण्यात यावी.

मा.श्री.पवार दगडू :- पावसाळयापुर्वी सीनानदी पात्रातील बाभळी व इतर किरकोळ झाडेझुडुपे तसेच अडथळे अतिक्रमणे काढली जात नाहीत. बजेट तरतुद काढुन टाका. ५ तासाचे काम असेल तर १० तास दाखवुन कामाची बिले काढली जातात. सदर चालू कामांवर कोणाचेही नियंत्रण रहात नाही.

उपायुक्त (कर) :- संपुर्ण सीनानदी अतिक्रमणे अडथळे काढुन साफ करण्याकरीता महानगरपालिकेला शक्य नाही.

मा.श्री.पवार दगडू :- जेसीबी भाडयाने लावण्या पेक्षा जुना जेसीबी लिलाव करुन नविन जेसीबी खरेदी करण्यात यावा.

मा.सभापती :- जुना जेसीबी लिलावात काढुन नविन जेसीबी खरेदी करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात यावा. सीनानदी पात्रातील अतिक्रमण व अडथळे हटविणेसाठी रक्कम रु.१८ लाखाची तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.भोसले गणेश :- वॉर्डातील कामासाठी जेसीबी लागल्यास केंव्हाही मागणी केली तरी जेसीबी नादुरुस्तच आहे असे सांगतात. पर्यायाने वॉर्डात कामे करतांना जेसीबी मुळे अनेक अडचणी येतात.

श्री.मगर :- महानगरपालिकेने खरेदी केलेला जेसीबी ९ वर्षापुर्वी खरेदी केलेला आहे. त्यावर रिपेअरींगचा खर्च भरपुर झालेला आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- महानगरपालिका शाळेतील विद्यार्थी संख्या कीती आहे.?

श्री.पठाण :- साधारणतः ११०० ते १२०० दरम्यान विद्यार्थी संख्या आहे. एका विद्यार्थ्यास दोन ड्रेस दिले जातात. गणवेश खरेदी स्टोअर विभागाकडुन करण्यात येते. शिक्षक दिनासाठी ठेवण्यात आलेली तरतुद वाढविण्यात यावी.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- बेंच खरेदी तरतुद वाढवावी लागेल. आमच्या विभागातील शाळेत विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंच नाहीत.

श्री.पठाण :- सदरची शाळा महानगरपालिका अखत्यारित नसुन जिल्हापरिषदेच्या नियंत्रणाखाली आहे.

मा.सभापती :- शिक्षक दिन खर्चा करीता रक्कम रु.२५ हजाराची तरतुद करण्यात यावी. शिक्षण मंडळाकडे वाहने कीती आहेत.

श्री.पठाण :- महानगरपालिका शिक्षण मंडळाकडे एकही वाहन नसुन मा.सभापती साहेबांसाठी भाडे तत्वावर वाहन घेण्यात येत आहे. ए व्ही रुमसाठी केलेली तरतुद वाढवुन ७ हजार करण्यांत यावी.

उपायुक्त (सा) :- महानगरपालिकेच्या मालकीचे काही जकात नाके कॅन्टोन्मेंट हद्दीत असल्याने कॅन्टोन्मेंट बोर्ड ठरविलेल्या हिश्यापेक्षा जास्त रक्कमेची मागणी करीत आहेत.

मा.श्री.भोसले गणेश :- पाथर्डी नाका, जामखेड नाका, सोलापूर नाका हे कॅन्टोन्मेंट हद्दीतुन काढुन आपल्या हद्दीत उभारावे म्हणजे त्यांना प्रश्न देण्याचा प्रश्नच उद्‌भवणार नाही.

उपायुक्त (सा) :- सावेडी भुयारी गटार योजना झाल्यानंतर आजमितीस टाकण्यात आलेले पाईप गटारचे काय करणार. सदर भागात पाईप गटारीची भरपुर कामे झालेली आहेत.

श्री.मगर :- सदर गटारी सांडपाणी, घाण पाणी वाहुन जाणेसाठीच केलेल्या आहेत. त्या तशाच राहतील. ड्रेनेज जोडणी फी वसुली अतिशय कमी आहे. ड्रेनेज जोडणी कामी करण्यात आलेली तरतुद रक्कम रु. २ लाख करण्यात यावी. महालक्ष्मी उद्यानात टॉयलेट बांधकाम करावयाचे आहे.

उपायुक्त (सा) :- महालक्ष्मी गार्डनमध्ये रिकामी जागा असेल तर तेथे बांधा व वापरा या तत्वावर शौचालय उभारण्यात येईल.

मा.श्री.पवार दगडू :- महानगरपालिके मार्फत शहरामध्ये व वाढीव हद्दीत नागरिकांच्या सोईसाठी ज्या फायबर मुता-या बसविण्यांत आलेल्या आहेत. त्यांची साफसफाई होत नसल्याने लोक त्या काढुन टाकतात.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- नविन वसाहतीतील रस्ते घेण्यात यावेत. सदर रस्त्यांसाठी वाढीव बजेट तयार करण्यात यावे.

उपायुक्त (सा) :- आज १७ जुलै अखेरीस मान्सुन हा समाधान कारक झालेला नसल्याने पिण्याच्या पाण्याची काही दिवसातच टंचाई भासणार आहे. शहरातील पाणीपुरवठा सुरळीत आणि व्यवस्थित होईल या करीता जादा निधी वापरण्यात यावा.

मा.श्री.भोसले गणेश :- खडीकरणासाठी दाखविण्यात आलेली तरतुद कमी प्रमाणात आहे. तरतुदीत वाढ करावी.

उपायुक्त (सा) :- बालिकाश्रम रस्ता व इतर ५ रस्त्यांचे ४४ कोटी रुपयांचे एस्टिमेट केलेले आहे. त्यातील नेप्ती नाका ते पत्रकार चौक या रस्त्याचे काम चालू आहे. बजेट शिल्लक नसल्याने काम चालू केलेले नाही.

श्री.शेंडगे :- बालिकाश्रम रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. सदर रस्त्यावरील अतिक्रमणे काढुन रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करण्यांत यावे.

मा.सभापती :- रस्ते खडीकरणा करीता रक्कम रु.२० लाख व रस्ते डांबरीकरण व नुतनीकरण रक्कम रु.४० लाख तरतुद करण्यांत यावी. नविन प्रशासकीय इमारतीसाठी रक्कम रु.१० लाखाची

तरतुद करण्यांत यावी. यश पॅलेस ते कोठी रस्ता नुतनीकरण रक्कम रु.१ लाखाची तरतुद करण्यात यावी. पिंपळगांव माळवी तलाव विकसीत करणे रक्कम रु.१ लाखाची तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- नगरसेवक निधी रक्कम रु.१० लाख करण्यात यावा.

उपायुक्त (सा) :- महानगरपालिकेच्या एकुण महसुली उत्पन्नाच्या जास्तीत जास्त २ टक्के नगरसेवक निधी ठेवता येतो. जादा निधी ठेवता येत नाही. मा.महापौर शहर विकास निधी, मा.उपमहापौर शहर विकास निधी , मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी, अशा प्रकारचे निधी बजेट हेड तयार करुन ठेवता येत नाहीत. अशा निधींची तरतुद नाही. मागील वर्षी अशा प्रकारचे हेड नव्हते. नंतर बजेट मध्ये तयार करण्यात आलेले आहे.

मा.श्री.भोसले गणेश :- मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, यांचे प्रमाणे विरोधी पक्ष नेत्याला सुध्दा रक्कम रु.२० लाख निधी देण्यात यावा. त्यांना सुध्दा त्यांचेकडेस आलेल्या नागरिकांची कामे करावी लागतात.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- योग्य आहे. विरोधी पक्ष नेत्यांना सुध्दा निधी द्यावा. महानगरपालिका कायद्यात अशा प्रकारचे निधी देण्याची तरतुद नसेल तर माहिती अधिकार कायद्यामुळे नागरिकांमध्ये जनजागृती झालेली आहे. आपण सभासद असे निधी ठेवल्याने अडचणीत येवू शकतो.

मा.श्री.भोसले गणेश :- मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.विरोधी पक्ष नेता यांना प्रत्येकी रक्कम रु. २० लाख निधी करावा. नाहीतर कोणालाच निधी देवू नका.

मा.सभापती :- विरोधी पक्ष नेता हे नविन हेड तयार करा. त्यांना पण निधी द्या.

मा.श्री.गव्हाळे :- मा.महापौर विकास निधी ठेवून बाकी सर्व निधी रद्द करा.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- सर्वांनाच निधी द्यायचा असेल तर सर्व स्थायी समिती सदस्यांनाही निधी द्या.

मा.सभापती :- फक्त मा.महापौर विकास निधी २.५० कोटी करण्यात यावा. पुढील पाच वर्षा करीता मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता यांना कुठलाही निधी ठेवण्यात येवू नये. प्रत्येक प्रभाग समितीसाठी रक्कम रु.१ लाखाची तरतुद करण्यात यावी.

उपायुक्त (कर) :- एकात्मीक गृहनिर्माण विकास कार्यक्रमा करीता करण्यात आलेली रक्कम रु.१ लाखाची तरतुद अतिशय कमी आहे. ती वाढविण्यात यावी.

श्री.मेहेत्रे :- एकात्मीक गृह निर्माण विकास योजना कार्यक्रम राबविणे करीता नियुक्त केलेल्या कंन्सलटंटची फी द्यावी लागणार आहे.

मा.सभापती :- एकात्मीक गृह निर्माण विकास योजने करीता रक्कम रु.१० लाखाची तरतुद करण्यात यावी.

उपायुक्त (कर) :- कत्तलखाना विकसित करणे करीता करण्यात आलेली तरतुद पुरेशी आहे काय ? भू संपादन करावे लागणार आहे.

श्री.धोंगडे :- पुरेशी आहे.

श्री.मेहेत्रे :- सदर कामासाठी ५.२० एकर जागा घ्यावी लागणार आहे.

मा.सभापती :- सर्व मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी, कर्मचारी यांनी सभा पार पाडणे कामी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. आजची मा.स्थायी समिती बजेटवरील बैठक संपल्याचे जाहीर करतो.

**<u>ठराव :-</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा. आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समितीकडे सादर झालेले अ.नगर महानगरपालिकेचे २००९-१० सालचे बाबवार अंदाजपत्रक( म.न.पा. स्कूल बोर्डासह) तसेच २००९-२०१० सालचे अंदाजपत्रका सोबतचे...

**<u>प्रस्ताव क्रमांक एक :</u>**- सार्वजनिक रस्त्यामध्ये वाहतुकीस अडथळा, येणा-या, कमान, सार्वजनिक जागेवर शुभेच्छा फलक, होर्डीग, बॅनर, तात्पुरते स्वरूपात मांडव, लाकडी टेबल, लोखंडी काट, स्टॉल करिता इत्यादी बाबत दरामध्ये भाडे वाढ करणे बाबत.

**<u>प्रस्ताव क्रमांक दोन :</u>**- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील इमारती व जमिनी या मिळकतीवर कर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नियम १२७(१) नुसार मालमत्ता कर बसविण्याची तरतुद आहे. परंतु जे नागरिक अनाधिकृत बांधकाम करून अथवा बांधकाम परवानगी न घेता इमारतीचा वापर करतात त्यांना दुप्पट दराने मालमत्ता कर आकारणी करणे बाबत.

**<u>प्रस्ताव क्रमांक तीन :</u>**- अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह भाडे वाढ करणे बाबत.

**<u>प्रस्ताव क्रमांक चार :</u>**- अहमदनगर महानगरपालिकेचा आरोग्य विभाग / घनकचरा यांच्या दरामध्ये भाडे वाढ करणे बाबत.

**<u>प्रस्ताव क्रमांक पाच :</u>**- अहमदनगर महानगरपालिकेचे मालकीचे मंगल, कार्यालय्, सभागृह यांच्या दरामध्ये भाडे वाढ करणे बाबत.

**<u>प्रस्ताव क्रमांक सहा :</u>**- अहमदनगर महानगरपालिकेचे सुवर्ण जयंती शहरी रोजगार द्रारिद्रय रेषेखालील कुटुंबाना द्रारिद्रय रेषा प्रमाणपत्र देताना शुल्क आकारणे बाबत.

**<u>प्रस्ताव क्रमांक सात :</u>**- अहमदनगर महानगरपालिकेचे जकात पारगमन फी मध्ये सुधारणा करून सर्व प्रकारच्या वाहनावर एकच दर लावणे बाबत.

**<u>प्रस्ताव क्रमांक आठ :</u>**- अहमदनगर महानगरपालिकेचे रस्ते विकासाचा खर्च भागविण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १४८ क नुसार रस्ता कर तरतुद मध्ये वाढ करणे बाबत.

**<u>प्रस्ताव क्रमांक नउः</u>**-अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाच्या रक्तघटक निर्मितीच्या प्रस्तावास मंजूरी देणे बाबत.

**<u>प्रस्ताव क्रमांक एक :</u>**- अहमदनगर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून सार्वजनिक जागा वापरा बाबत सभेमध्ये साधक बाधक चर्चा होवुन पुढील प्रमाणे जागा वापरा बाबत भाडेवाढ करणेस शिफारस करण्यांत आली.

**<u>(१)</u>** सार्वजनिक रस्त्यामध्ये अडथळा न येता कमान उभारणे बाबत रूपये ५०/- प्रतिदिन एक कमानीसाठी आकारणी करण्यांत येईल.

**<u>(२)</u>** सार्वजनिक रस्त्यामध्ये शुभेच्छा, फलक होर्डींग , बॅनर पोस्टर्स, जाहिरात फलक लावण्याकरिता रूपये २००/- प्रतिदिन आकारणी करण्यांत येईल.

**<u>(३)</u>** उत्सवाचे कालावधी मध्ये रक्षाबंधन, गणपती, नवरात्र, दिपाली,सणाचे कालावधी मध्ये नागरिक सार्वजनिक जागेवर तात्पुरते स्वरूपात मांडव, लाकडी मांडणी टेबल, लोखंडी कॉट,इत्यादी तात्पुरत्या स्टॉल करिता २५ चौ. फुटास जागेकरिता एका दिवसासाठी रूपये १००/- व पुढील क्षेत्रासाठी १००/- च्या पटीत आकारणी करण्यांत येईल जे नागरिक सार्व. जागेचा वापर वरील पैकी कोणत्याही प्रयोजनासाठी विनापरवानगी केल्याचे आढळून आल्यास दराचे दुप्पट आकारणी करून सदर बिलाची रक्कम घरपट्टी बिलामध्ये समाविष्ठ करण्यांत येईल.

**(४)** नागरिक, व्यापारी, संघटना मंडळे हे सार्वजनिक रहदारीस व नागरिकास अडथळा करून उपद्रव निर्माण करतील अशा व्यक्ती विरूध्द किमान ३०० रूपये प्रतिदिन दंडाची आकारणी करण्यांत येईल. या प्रमाणे सन २००९-१० सालाकरिता दर आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक दोन:-**अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमधील इमारती व जमिनी या मिळकतीवर कराबाबत सभेमध्ये साधक-बाधक चर्चा होवून सदर प्रस्तावास मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक तीन :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृहास सभेमध्ये साधक बाधक चर्चा होवून कार्यालयीन प्रस्तावानुसार वाढ करून आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक चार :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभाग / घनकचरा वाढ करण्यांस खालील प्रमाणे आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस आहे.

| अ.क्र. | कचरा उत्पादक | वापरबाबतचे दर प्रति महा रूपये |
|---|---|---|
| १ | घरगुती- ७०००० | रूपये २०/- |
| २ | व्यावसायिक- ३२०० | रूपये १००/- |
| ३ | औद्योगिक- ४० | रूपये २०० |
| ४ | हॉटेल्स, पोल्ट्रीज+ नर्सिंग होम्स- १५० | रूपये २५०/- |

याप्रमाणे सन २००९-२०१० सालाकरिता दर आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक पाच :-**अहमदनगर महानगरपालिकेचे मालकीच्या मंगल कार्यालयाचे, सभागृहाचे दर (१) अहमदनगर महानगरपालिकेचे मंगल कार्यालयाचे डिपॉझिट रूपये २०००/-(२) अहमदनगर महानगरपालिकेचे मनपा, कार्यालये,सभागृह विनामुल्य देतांना लाईटपोटी रू.३००/-व स्वच्छतेसाठी रू.२००/-अशी रूपये ५००/-याप्रमाणे सन२००९-१०सालाकरिता दर आाकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक सहा :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सुवर्ण जयंती रोजगार द्रारिद्रय रेषेखालील कुटुंबांना द्रारिद्रय रेषा अनुक्रमांक प्रमाण पत्र देतांना सभे मध्ये साधक बाधक चर्चा होवून ५० शुल्क आकारणी सन २००९-१० साला करिता शुल्क आकारणी करणेस मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक सात** :- अहमदनगर महानगरपालिकेचे जकात पारगमन फी सुधारणा दरा बाबत कार्यालयीन प्रस्ताव मंजूर सभे मध्ये चर्चा होवून सन २००८-०९ मध्ये असलेले वेगवेगळे दर रू. ६०/- व १००/- या ऐवजी सर्व वाहनासाठी रूपये १००/- याप्रमाणे दर आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक आठ :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रस्ते कर या प्रस्तावावर चर्चा होउन २% रस्ता कर आकारणी करणेस याप्रमाणे सन २००९-१० साला करिता दर आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक नउ :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाच्या कार्यालयीन प्रस्तावावर खालील प्रमाणे आकारणी करणेस मंजूरी देण्यांस शिफारस आहे.

| अ.क्र. | रक्तघटक | सवलत पत्राचे दर | सवलत पत्र नसल्यास दर |
|---|---|---|---|
| १ | PCV | २५०/- | ४००/- |
| २ | FFP | २५०/- | ४००/- |
| ३ | PLATELET | २५०/- | ४००/- |
| ४ | WHOLE BLOOD | २५०/- | ४००/- |

या प्रमाणे सन २००९-१० साला करिता दर आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

त्याच प्रमाणे मा. आयुक्त साहेब यांनी मनोगता मध्ये सूचविलेल्या योजना राबविणे कामी उपाय योजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे. तसेच मा. सदस्यांनी सूचविलेली कामे अंदाजपत्रकातील संबंधीत लेखा शिर्षामधून व त्यांना मंजुर करण्यांत आलेल्या स्वेच्छा निधी मधुन करणेत यावीत.

सन २००९-१० सालचे अंदाजपत्रकामध्ये सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चे प्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्या नुसार जमा व खर्चाच्या अंदाजीत रकमा कमी / जास्त करणेस नवीन लेखा शिर्ष तयार करून त्यावर तरतुद करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

वरील प्रस्ताव क्र.१ ते ६ व ८,९ चे दर दिनांक १/८/२००९ पासुन लागु करणेस शिफारस तसेंच प्रस्ताव क्र.७ या विषयी मा.शासनाचे मंजुरी नंतर लागु करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

अंदाजपत्रकाच्या दोनशे प्रती छापून घेवून मनपा सदस्यांना देण्यांत याव्यात, खर्च मंजूर.

वरील प्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त शिफारसीसह सन २००९-२०१० सालचे बाबवार मूळ अंदाजपत्रक महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या हिस्सा सह मा. महानगरपालिका सभेपुढे सादर.

**सोबत :- सन- २००९-२०१० सालचे अंदाजपत्रकात केलेल्या बदलांचा तक्ता.**

नियमानुसार कार्यवाही करावी.

सूचक :- मा.श्री.बाळासाहेब रेवजी पवार सही /-

अनुमोदक :- मा.श्री.विजय नाना गव्हाळे सही /-

सही /-<br>**( श्री. संजय बाबुराव गाडे )**<br>सभापती,<br>स्थायी समिती ,<br>अहमदनगर महानगरपालिका.

| अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर- | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २००९-२०१० चा अर्थसंकल्प | | | | | |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२००९).........................................१४८४८६६३१ | | | | | |
| एकुण जमा.....................................................................१६२४१५८३०० | | | | | |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा...............................................१७७२६४४९३१ | | | | | |
| एकुण खर्च.................................................................... १७२२२६६२०० | | | | | |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१०).....................................५०३७८७३१ | | | | | |
| अ.नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू) | मा. आयुक्त यांनी | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा. स्थायी |
| | | सुचविलेली | वाढ | घट | समितीने शिफारस |
| | | तरतुद | | | केलेली तरतुद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | १८००००००० | ५००००००० | | २३००००००० |
| २ | कुत्र्यावरील कर | ० | १०० | | १०० |
| ३ | गाळा भाडे | ११०००००० | १०००००० | | १२०००००० |
| ४ | मंगल कार्यालये, सभागृह व इतर | ६००००० | ४००००० | | १०००००० |
| ५ | अनधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे | ५०००००० | १०००००० | | ६०००००० |
| ६ | जाहिरात बोर्ड जागा भाडे | २०००००० | ५००००० | | २५००००० |
| ७ | ड्रेनेज जोडणी फी | २००० | १९८००० | | २००००० |
| ८ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | ९००००००० | १००००००० | | १०००००००० |
| ९ | बांधा, वापरा, हस्तांतर करा/एफबीटी प्रकल्प (प्रिमियम) | १००० | ९९९९००० | | १००००००० |
| १० | अल्पसंख्याक बहुल क्षेत्र विकास ाधिी | ० | २०००००० | | २०००००० |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | २८८६०३००० | ७५०९७१०० | ० | ३६३७००१०० |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा. आयुक्त यांनी | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा. स्थायी |
|---|---|---|---|---|---|
| | | सुचविलेली | वाढ | घट | समितीने शिफारस |
| | | तरतुद | | | केलेली तरतुद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अपघात विमा योजाा | १०००० | ९०००० | | १००००० |
| २ | उनाड कुत्री बंदोबस्त करणे व दंशावर उपचार करणे | १८००००० | २००००० | | २०००००० |
| ३ | विद्युत साहित्य खरेदी | १३००००० | ७००००० | | २०००००० |
| ४ | रस्ते व इमारतीवरील विज बिल | १२०००००० | ३०००००० | | १५०००००० |
| ५ | नवीन इले. पोल, स्ट्रीट लाईट स्पॅा फिटींग | १२००००० | ४८००००० | | ६०००००० |
| ६ | वाहतूक नियंत्रक देखभाल | ७००००० | ३००००० | | १०००००० |
| ७ | खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतूक करणे | १०००००००० | १५०००००० | | ११५०००००० |
| ८ | हायप्रेशर युनिट खरेदी | ३००००० | ७००००० | | १०००००० |
| ९ | पर्यावरण अहवाल खर्च | १००००० | २००००० | | ३००००० |
| १० | कोंडवाडा बांधकाम करणे | ५००००० | ५००००० | | १०००००० |
| ११ | वैरण, चारा खरेदी करणे | १००००० | | ७५००० | २५००० |
| १२ | वृक्षारोपन वृक्ष संरक्षण व ट्री गार्ड खरेदी | ३००००० | २००००० | | ५००००० |
| १३ | बागेतील खेळणी खरेदी व देखभाल | ३००००० | २००००० | | ५००००० |
| १४ | रस्ते दुरुस्ती (पॅचिंग व मुरूम टाकणे) | १५००००० | ५००००० | | २०००००० |
| १५ | रस्ते कॉक्रीटीकरण | १५००००० | ५००००० | | २०००००० |
| १६ | प्रभागात झोननिहाय किरकोळ दुरूस्ती खर्च | ० | ४००००० | | ४००००० |
| १७ | क्रीडा साहित्य खरेदी | ५००००० | ५००००० | | १०००००० |
| १८ | सिना नदी प्रात्रातील अतिक्रमणे, अडथळे हटविणे, साफसफाई करणे | ८००००० | २००००० | | १०००००० |
| १९ | ए. व्ही. रुम | १००० | २५००० | | २६००० |
| २० | शिक्षक दिन खर्च | १०००० | १५००० | | २५००० |
| २१ | गटर्स दुरुस्ती | १०००००० | ५००००० | | १५००००० |
| २२ | ड्रेनेज दुरुस्ती | १०००००० | ५००००० | | १५००००० |
| २३ | नविन मुतारी व रिपेअर | ५००००० | | ४००००० | १००००० |
| २४ | ड्रेनेज सर्वेक्षण | १००० | ९९००० | | १००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५ | मलनि:सारण करणे | ० | ५०००० | | ५०००० |
| २६ | रस्ते खडीकरण | १२००००० | ३००००० | | १५००००० |
| २७ | रस्ते डांबरीकरण व नुतणीकरण | २०००००० | १०००००० | | ३०००००० |
| २८ | यश पॅलेस ते कोठी रस्ता नुतनीकरण | ५००००० | | ४००००० | १००००० |
| २९ | नविन इमारत | १४००००० | | १०००००० | ४००००० |
| ३० | अधिकारी यांचे निवास बांधणे | १०००००० | | ९००००० | १००००० |
| ३१ | पिंपळगाव तलाव विकसित करणे | ५००००० | | ४९०००० | १०००० |
| ३२ | मा. सद्स्य प्रभाग विकास स्वेच्छानिधी | २०००००००० | २९०००००० | | ४९०००००० |
| ३३ | महापौर शहर विकास निधी | ० | २०००००००० | | २०००००००० |
| ३४ | प्रभाग समिती क्र. १ | २५००००० | | २४००००० | १००००० |
| ३५ | प्रभाग समिती क्र. २ | २५००००० | | २४००००० | १००००० |
| ३६ | प्रभाग समिती क्र. ३ | २५००००० | | २४००००० | १००००० |
| ३७ | प्रभाग समिती क्र. ४ | २५००००० | | २४००००० | १००००० |
| ३८ | एकात्मिक गृहनिर्माण विकास कार्यक्रम | १००००० | ९००००० | | १०००००० |
| ३९ | भू-संपादन करणे | १०००००० | ५००००० | | १५००००० |
| ४० | शहरात नविन पाईपलाईन टाकणे | ७०००००० | १०००००० | | ८०००००० |
| ४१ | वाढीव हद्दीत पाईपलाईन टाकणे | ४०००००० | ३८४०००० | | ७८४०००० |
| ४२ | मागासवर्गीय कल्याणकारी योजनेतून लालटाकी/सिध्दार्थनगर येथ पाण्याची टाकी बांधणे | २५००००० | १०००००० | | ३५००००० |
| ४३ | मार्केट यार्ड येथे पाण्याची टाकी बांधणे | २५००००० | १०००००० | | ३५००००० |
| ४४ | थकीत देयके अदा करणे | ७०००००००० | १०००००००० | | ८०००००००० |
| ४५ | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ | ० | १०००००० | | १०००००० |
| ४६ | अल्पसंख्याक बहुल क्षेत्र विकास निधी | ० | २०००००० | | २०००००० |
| | | | | | |
| | | **१५९१२२०००** | **८७६६९०००** | **१२८६५०००** | **२३३९२६०००** |

सही /-
श्री. संजय बाबुराव गाडे,
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २ मंगळवार दि.१४/७/२००९

ठराव क्रमांक - २ मंगळवार दि.१४/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसूलीसाठी एक वर्षाच्या कालावधी करीता जकात अभिकर्ता नेमणेकामी मागविण्यात आलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट यावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अहमदनगर महानगरपालिकेचे क्षेत्रात जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणेबाबत मागविण्यांत आलेल्या निविदांसंदर्भात वृत्तपत्रातुन चौथ्यांदा प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदेनुसार एकच निविदा प्राप्त झालेली आहे, तसेच अहमदनगर महानगरपालिकेने चौथ्यांदा प्रसिध्द केलेल्या निवेदनातील तारखेनुसार आज दि. २२/५/०९ रोजी दु. २ वा. निविदा उघडणेबाबतची प्रक्रिया सुरू करण्यात आली, त्यावेळी खालील मा. पदाधिकारी, अधिकारी तसेच निविदाकार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

१) मा. महापौर, अ.नगर महानगरपालिका.
२) मा. उपमहापौर, अ.नगर महानगरपालिका.
३) मा. आयुक्त, अ.नगर महानगरपालिका.
४) मा. उपायुक्त (सा.) अ.नगर महानगरपालिका.
५) मा. सहा.आयुक्त, अ.नगर महानगरपालिका.
६) मा. मुख्य लेखाधिकारी, अ.नगर महानगरपालिका.
७) मा. मुख्य लेखा परिक्षक, अ.नगर महानगरपालिका.
८) मा. प्रसिध्दी अधिकारी , अ.नगर महानगरपालिका.
९) निविदा धारक श्री. आगरवाल भगवती प्रसाद
१०)निविदा धारकाचे प्रतिनिधी श्री. किशोर आगरवाल.
११) दै. सकाळचे पत्रकार
१२) दै. पुढारीचे पत्रकार
१३) दै. लोकमतचे पत्रकार

दि.२२/५/२००९ रोजी दु. २ वा. पर्यत मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड, मुंबई यांची केवळ एकच निविदा प्राप्त झालेली आहे.

वरील निविदा उघडणेबाबतची प्रक्रिया मा.आयुक्त यांचे दालनात दि. २२/५/०९ रोजी दु.३ वा. सुरू करण्यात आली.

मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड, मुंबई यांनी निविदेत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यामुळे सदरची निविदा ग्राह्य धरून सर्वांचे समक्ष उघडण्यात आलेली आहे,

सदर निविदातील देकार रक्कमेबाबतचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | निविदाकाराचे नांव | निविदातील देकार रक्कम |
|---|---|---|
| १) | मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड, मुंबई. | ४८,०६,००,०००/- |

तसेच मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड, मुंबई यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या नगर- औरंगाबाद रोड येथील प्रशासकीय इमारतीच्या दुस-या मजल्याचे रक्कम रू. १ कोटी ४० लाख चे बांधकाम करून देण्यास तयारी दर्शविली आहे.

सदर निविदा उघडण्याबाबत झालेल्या प्रक्रियेचे कार्यवृत्त व प्राप्त निविदेचा तपशील सोबत सादर केलेला आहे.येणे प्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे दि. २२/५/०९

मा. उपायुक्त (सा) साहेब :- सहमती दर्शक सही दि. २२/५/०९

--**--

अहमदनगर महानगरपालिकेच्या जकात वसुलीकरीता अभिकर्ता नेमणेकरिता अहमदनगर महानगरपालिकेकडुन विहित नमुन्यात मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या, निविदा दाखल करण्याची अंतीम तारीख दि. २२/५/२००९ रोजी दु. २ वा. पर्यंत होती, निविदा त्याच दिवशी दु. ३ वा. कार्यालयीन वेळेत उघडण्यात आली.

आलेल्या निविदा उघडण्यासाठी मा.आयुक्त कार्यालयात मिटींग बोलविण्यांत आली होती, सदर मिटींगला खालील प्रमाणे मा. पदाधिकारी, अधिकारी तसेच निविदाकार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

१) मा. महापौर, अ.नगर महानगरपालिका.
२) मा. उपमहापौर, अ.नगर महानगरपालिका.
३) मा. आयुक्त, अ.नगर महानगरपालिका.
४) मा. उपायुक्त (सा.) अ.नगर महानगरपालिका.
५) मा. सहा.आयुक्त, अ.नगर महानगरपालिका.
६) मा. मुख्य लेखाधिकारी, अ.नगर महानगरपालिका.
७) मा. मुख्य लेखा परिक्षक, अ.नगर महानगरपालिका.
८) मा. प्रसिध्दी अधिकारी , अ.नगर महानगरपालिका.
९) निविदा धारक श्री. आगरवाल भगवती प्रसाद
१०) निविदा धारकाचे प्रतिनिधी श्री. किशोर आगरवाल.
११) दै. सकाळचे पत्रकार
१२) दै. पुढारीचे पत्रकार
१३) दै. लोकमतचे पत्रकार

उपरोक्त उपस्थितांसमोर आलेल्या निविदेची सिलबंद पेटी उघडण्यात आली त्यामध्ये मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मुंबई यांचे सिलबंद निविदा पाकिट असल्याचे दाखविण्यात आले.

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचे पाकिट उघडण्यासाठी घेण्यात आले, तदपुर्वी निविदाबाबतच्या अटी व शर्ती वाचुन दाखविण्यात आल्या.

**निविदा धारकासाठी आवश्यक पात्रता :-**

१) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकास / संस्थेस किमान एक वर्षाचा जकात / पथकर वसुली केल्याचा अनुभव असावा. तसे संबंधीत महानगरपालिकेचे अथवा तत्सम विभागाचे प्रमाणपत्र सोबत जोडणे बंधनकारक आहे. २) निविदा धारक / संस्था ही नोंदणकृत (पंजीकृत) असावी. तसेच निविदा धारकाची / संस्थेची कोणत्याही व्यवसायातील लगतच्या किमान तीन वर्षाची दरवर्षाची वार्षिक उलाढाल रू. ३० कोटीची असावी. ३) बयाणा रक्कम रू. २,४०,००,५५०/- चा डी.डी. (दोन कोटी चाळीस लक्ष पाचशे पन्नास रूपये फक्त) निविदे सोबत भरणा करणे बंधनकारक आहे. ४) निविदा धारकास निविदा मंजुरी नंतर राष्ट्रीयकृत बँकेची अथवा शेडयुल्ड बँकेची बॅक गॅरेंटी (हमीपत्र) किमान देकार रक्कमेच्या १६% एवढी देणे बंधनकारक आहे. ५) निविदा धारकाने / नोंदणीकृत संस्थेने नजीकच्या तीन वर्षाचा प्राप्तीकर भरणा केल्याबाबतचे प्रमाणीत केलेले चलन सोबत जोडणे बंधनकारक आहे. ६) निविदाधारकाच्या जकात संकलनाच्या एक वर्षाच्या कालावधीत किमान देकार रक्कमेच्या व्यतिरिक्त नगर-औरंगाबाद रोड वरील महानगरपालिकेच्या मालकीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या दुस-या माळयाचे रू.१ कोटी ४०लक्ष चे बांधकाम पुर्ण करून देणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

वरील अटी व शर्तीची प्राप्त झालेल्या निविदाधारकाने पुर्तता केली असल्याची खात्री करून घेण्यात आली, तद्नंतर मुळ अटी व शर्ती व प्राप्त निविदामधील कागदपत्रे तपासुन सदरची तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले, त्याचा तपशील पुढील प्रमाणे.

| अ.नं. | निविदाकाराचे नांव | म.न.पा.ची प्रशासकीय इमारतीच्या दुस-या मजल्याचे बांधकाम करून देण्यास तयार आहे काय? | निविदातील देकार रक्कम |
|---|---|---|---|
| १) | मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड, मुंबई | होय | रू. ४८,०६,००,०००/- |

वरील प्रमाणे एकच प्राप्त निविदेतील तपशील नुसार मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड, मुंबई, यांची एकच निविदा प्राप्त झालेली आहे. (चौथ्यांदा) मे. सहकार एजन्सीज प्रा.लि.मालाड, मुंबई यांची देकार रक्कम रू. ४८,०६,००,०००/- (अक्षरी रू. अठठेचाळीस कोटी सहा लाख फक्त) व अटी व शर्ती नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे दुस-या माळयाचे रू. १ कोटी ४० लाख रू. चे बांधकाम पुर्ण करून देण्याची अट मान्य केलेली आहे.

जकात अभिकर्ता नेमणुकी बाबत एकुण ४ वेळेस निविदा मागविणे बाबत प्रसिध्दी देण्यात आली होती, मात्र मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मुंबई यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही एजन्सीजने निविदा भरण्यास प्रतिसाद दिलेला नाही, सदरची वस्तुस्थिती विचारात घेता मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. यांची निविदा मंजुर करून त्यांना कार्यारंभ आदेश दिल्यापासून १ वर्षाच्या कालावधी करीता जकात अभिकर्ता नेमणे बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ नियम ३५ व निविदेतील अटी व शर्ती नुसार जकात अभिकर्ता नियुक्ती करणे बाबत मा. स्थायी समितीची मान्यता घेणे करीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य आहे.

तरी पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे
मुख्य लेखा परिक्षक :- सादर **'अ'** प्रमाणे मान्यतेस्तव दि. २६/५/०९
मा.उपायुक्त (सा.), साहेब :- CAFO सहमती दर्शक सही दि.२६/०५/०९
मुख्य लेखा अधिकारी :- सादर, सन-२००९-१० साठी जकात अभिकर्ता नेमणूक करणेकामी
अहवालाप्रमाणे मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव ठेवणे योग्य. दि. २७/५/०९
मा.उपायुक्त (सा.),साहेब :- **'अ'** प्रस्तावीत नुसार मा. स्थाई समितीकडे निविदा मंजुरीसाठी पाठविणे
करिता मान्यतेस्तव सादर. दि. २७/०५/०९
मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. २७/०५/०९
सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.उपायुक्त (सा) :- जकातीचा प्रस्ताव वाचण्यात यावा.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- आजच्या बोलाविण्यांत आलेल्या मा.स्थायी समिती सभेमध्ये सर्व नगरसेवकांना येथे बोलाविण्यात यावे. नाहीतर फक्त स्थायी समिती सदस्यांनाच या हॉलमध्ये बैठकीसाठी ठेवण्यात यावे. इतर सदस्यांना सभागृहाबाहेर काढण्यात यावे.

मा.श्री.शेख नजीर अहमद :- यापुर्वी झालेल्या स्थायी समिती, सर्वसाधारण सभे मध्ये जेष्ठ नगरसेवक बसलेले होते. त्या सभांचे काय झाले. त्याचे रेकॉर्डींग आहेत फोटो आहेत. त्यांचे काय ?

मा.श्री.लोंढे शिवाजी :- एकतर सभेमध्ये सर्वांना बोलवा. नाहीतर सर्वांना समान न्याय द्या.

यानंतर सभागृहामधुन ज्येष्ठ नगरसेवक व पत्रकार बाहेर गेल्यानंतर विषयाचे वाचन सुरु करण्यात आले.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- शहराच्या विकासाकरीता लागणारा पैसा उभा करणे बाबत आलेला आर्थिक प्रश्ना संबंधी जो जकातीचा प्रस्ताव आलेला आहे. त्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी राहिलेल्या आहेत. सन २००९-२०१० करीता जकातीचा ठेका देणे बाबत जो ठराव करण्यात आला त्याचे इतिवृत्त मंजूर केलेले नाही. त्याबाबत माहिती देण्यात यावी. इतिवृत्त मंजूर नसतांना जकात मंजूर करता येते काय ?

मा.उपायुक्त (सा) :- महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ढासळत असतांना ती भक्कम करणेकरीता अहमदनगर शहरात आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली करणे व शहरातुन जाणा-या मालवाहतुक वाहनांवर पारगमन फी आकारणे बाबतचा विषय सर्व साधारण सभेपुढे मंजूरीसाठी घेण्यात आला होता. सर्व साधारण सभेनंतर लगेचच लोकसभा निवडणुकीची आचार संहिता लागू होणार असल्याने व इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता ठराव अंतिम मंजूर केलेला आहे.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- विषयाचे इतिवृत्त मंजूर न करता त्यास मंजूरी देणे योग्य नाही. जकातीचा विषय मंजूर करणे चूकीचे आहे. नागरिकांसाठी आवश्यक असणा-या जिवनावश्यक वस्तुंचे भाव मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहेत. त्यात ही जकात लावणे योग्य नाही.

मा.सभापती :- आपले म्हणणे लेखि स्वरुपात देण्यात यावे.

मा.उपायुक्त (सा):-आजच्या मिटींगमध्ये घेण्यात आलेल्या विषयानुसारच चर्चा करण्यात यावी.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- आज आपण जकातीचा ठेका देणे बाबत ज्या निविदा मागविण्यात आलेल्या होत्या त्यामध्ये फक्त एकच निविदा आलेली आहे. दिनांक ३१ मार्च पासुन जकातीचा ठेका देण्यात यावा. पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात. त्यानंतर ठेका देण्यांत यावा. यामुळे महानगरपालिकेचे हित जोपासले जाईल. ठेकेदार व प्रशासन यांची हातमिळवणी झालेली आहे अशी शहरात चर्चा चालू आहे. यामुळे फेरनिविदा काढण्यात याव्यात. व त्यातुन जाचक अटी वगळाव्यात.

मा.उपायुक्त (सा) :- अहमदनगर महानगरपालिका सभेने जकात ठेका देकार रक्कम ४८ कोटी ठरविली व त्यानंतर लोकसभा निवडणुक आचारसंहिता चालू होणार असल्याने तातडीने टेंडर कॉल केले होते. टेंडर चार वेळा प्रसिध्द केले. चांगल्या खपाच्या दैनिकात प्रसिध्द केले. पहिल्या वेळेस दोन निविदा विकल्या गेल्या त्यापैकी एका ठेकेदाराने निविदा भरली. दुस-या वेळेस एकही निविदा विकली गेली नाही. तिस-या वेळेस दोन निविदा विक्री केल्या गेल्या. एका ठेकेदाराने निविदा दाखल केली. तो ठेकेदार किमान देकार रक्कम ४८ कोटी ५१ लाख देण्यास तयार होता. परंतु महानगरपालिकेच्या तिस-या मजल्यावरील बांधकाम करणार नाही. अशी त्याने अट टाकली होती. एकट्याचीच निविदा आलेली होती. १.४० कोटीच्या बांधकामास प्राधान्य असे त्याने सदर रकान्यामध्ये भरलेले नसल्यामुळे त्याची निविदा रद्द केली. नंतर चौथ्या वेळेस निविदा मागविली. एक निविदा भरुन आली. महानगरपालिकेचा जकात ठेका व प्रशासकीय इमारतीच्या वरील तिस-या मजल्याचे बांधकाम करण्यास कोणीही तयार नसल्याने काही अटी व शर्थी शिथील करण्यात आल्या. तरीपण कोणीही जकातीकरीता आले नाही. दैनंदिन कामासाठी जकातीचे खाजगीकरण करणे आवश्यक आहे. एक निविदा ६.७० लाख ने जास्त आलेली आहे. त्यांनी बांधकाम मान्य केलेले आहे. आता फक्त विषय मंजूर करावयाचा आहे. चौथ्या वेळेस एक निविदा आली तरी ती मंजूर करता येते.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- सभापती साहेब, उपायुक्त साहेब आज मा.स्थायी समिती सभेपुढे सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करण्याकरीता आले आहे. नंतर जकात ठेका देण्याचा विषय सभेपुढे आला आहे. जकातीचा विषय अनेक महिन्यापासुन प्रलंबित आहे. नागरिकांच्या सतत चर्चेत राहणारा विषय आहे. आपल्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अतिशय वाईट आहे. कर्मचा-यांचे या महिन्याचे पगार अद्यापपर्यंत झालेले नाहीत. जकाती पासुन दररोज १४ ते १५ लाख रुपये उत्पन्न मिळत होते. ते आता ७ ते ८ लाखापर्यंत खाली आलेले आहे. महानगरपालिका अतिशय आर्थिक संकटात आलेली आहे. मा.लोंढे हे महानगरपालिकेला आर्थिक संकटातुन बाहेर काढण्यात यावे अशा आशयाचे निवेदन घेवून मा.जिल्हाधिकारी सो, अहमदनगर यांना भेटलेले आहेत. मध्यंतरीच्या काळात आपल्या कोर्ट कचेरी मुळे मा.स्थायी समिती अस्तित्वात येवू शकली नाही. त्यामुळे हा जकात ठेका देणे बाबतचा विषय तातडीने मा.स्थायी समितीपुढे घेण्यात आला. महानगरपालिकेचे हित साधावयाचे असेल तर हा विषय तातडीने मंजूर करावा अशी सर्वांना विनंती करतो.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- प्रशासकीय इमारतीवरील करावयाच्या बांधकामाच्या मुदतीचा कालावधी किती ?

मा.उपायुक्त (सा) :- महानगरपालिकेच्या जकातीचा ठेका मंजूर होउन्न कार्यारंभ आदेशापासून एक वर्षाच्या मुदतीचा ठेका देणार असल्याने त्याच काळात बांधकाम करुन देणे संबंधितांवर बंधनकारक राहील. करार करतांना करारनाम्यावर दोन मा.स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्ष-या असतील.

मा.श्री.पवार बाळासाहेब :- सदर प्रशासकीय इमारतीवर बांधकाम करतांना महानगरपालिकेने सुपव्हीजन करण्यात यावे.

मा.श्री.भोसले गणेश :- दरवर्षी जकातीचा ठेका हा मार्च महिन्यातच देण्यात यावा.

मा.उपायुक्त (सा) :- महानगरपालिका महासभेमध्ये जकात ठेक्याने देणे बाबतचा विषय घेण्यात आलेला होता. त्यावेळी सर्व सदस्यांनी त्यावर चर्चा विनिमय केलेली आहे. त्या ठरावास मंजूरी दिलेली आहे. त्याकरीता पुन्हा पुन्हा तीच तीच चर्चा करणे योग्य होणार नाही. आपणही सदरचा ठराव मंजूर केलेला आहे.

मा.श्री.लोंढे शिवाजी :- आम्ही भाजपा शिवसेनेचे खालील नगरसेवक जकात ठेक्याने देण्या बाबतच्या ठरावास आमचा विरोध नोंदवत आहोत. तो नोंदवुन घ्यावा. ती नावे खालील प्रमाणे.
मा.श्री.लोंढे शिवाजी बाळासाहेब, मा.श्रीमती.ढोणे मालन सुरेश, मा.श्रीमती.ढवण शारदाबाई दिगंबर, मा.श्रीमती.शिंदे शिला अनिल, मा.श्री.शेलार नितीन शिवाजी, मा.श्री.शेंडगे संजय छगन

मा.सभापती :- जकात ठेक्याने देणेबाबतचा विषय उपस्थित सदस्यांपैकी ९ विरुध्द ६ मतांनी मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली कामी दिनांक ०१/०८/२००९ ते दिनांक ३१/०७/२०१०अखेर एक वर्षाचे कालावधी साठी जकात ठेक्याची देकार रक्कम रूपये ४८,०६,००,०००/- (रूपये अठ्ठेचाळीस कोटी सहा लाख फक्त ) निश्चित करणेस तसेच जकात अभिकर्ता नेमणे कामी मागविण्यात आलेल्या जाहीर निविदास मंजूरी देण्यांत येत आहे. जकात अभिकर्ता यांनी औरंगाबाद रोड येथील अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या दुस-या मजल्याकरीता रक्कम रुपये १.४० लाख (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी चाळीस लाख मात्र ) संपुर्ण बांधकाम (दारे, खिडक्या, फरशी व इलेक्ट्रीक फिटींग इत्यादी आवश्यक बाबीसह) ठेक्याच्या कालावधीमध्ये त्यांचे आराखडे महानगरपालिकेकडून मंजूर करून पुर्ण करुन देण्यात यावे. सदरच्या ऑफिस प्रस्तावास बहुमताने मंजूरी देण्यात येत आहे.

तथापि सदर ठरावास मा.श्री.लोंढे शिवाजी बाळासाहेब, मा.श्रीमती.ढोणे मालन सुरेश, मा.श्रीमती.ढवण शारदाबाई दिगंबर, मा.श्रीमती.शिंदे शिला अनिल, मा.श्री.शेलार नितीन शिवाजी, मा.श्री.शेंडगे संजय छगन यांचा विरोध नोंदविण्यांत येत आहे.

सदर सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी. ऑफीस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.बाळासाहेब रेवजी पवार. सही /-
अनुमोदक : मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले सही /-
ठराव बहुमताने मंजूर.

Sdxxx/-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.